मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६, ९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९३ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



अश्विन अण्णाच्या दुहेरी कामगिरीपुढे बांग्लादेश 'ढेर'
पान ७

## म ह त्वा चे

### माझी फसवणूक झाल्यासारखं वाटतं - पवन कल्याण

**हैदराबाद :** - आंध्रप्रदेशमधील तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खबळबळ उडाली. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केले जात असून आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहे. त्यातच आता आंध्रचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांनी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. मी प्रसादाच्या लाडूमधील भेसळ रोखू शकलो नाही, त्यामुळे मला आतून फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करून प्रायश्चित करत आहे, अशी पोस्ट पवन कल्याण यांनी एक्सवर टाकली आहे.

### जिथे माजवली दहशत, तिथेच गुंडांची काढली धिंड

**नाशिक :** गुंड मिळून न आल्याने घरांवर दगडफेक करत दहशत माजविणाऱ्या गावगुंडांची नाशिक शहर पोलिसांनी रविवारी (दि.२२) सदगुरुनगरमध्ये धिंड काढली. जिथे दहशत माजवली तिथेच गुंडांचा पोलिसांनी माज उतरवल्याने नागरिकांना आनंद झाला. अरुण बंडी (वय २७) व महेश सोनवणे (२१) अशी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी आणखी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहेत. सातपूरमधील सदगुरूनगर परिसरात शनिवारी रात्री १०.१५ च्या सुमारास सुमारे १२ गुंडांनी हातात कोयता नाचवत दहशत माजवली होती. या भागातील काठे अपार्टमेंट या इमारतीवर व एका दुकानावर गुंडांनी दगडफेक केली. यात या इमारतीतील १० फ्लॅटच्या काचा फुटल्या. जुन्या वादातून गुंड समीर सय्यद नामक युवकाला मारहाण करण्यासाठी गुंड आले होते. मात्र, युवक व त्याचा मित्र आव्हाड मिळून न आल्याने गुंडांनी परिसरात हातातील कोयते नाचवले व दहशत निर्माण करण्यासाठी दगडफेक केली. दुचाकीवरून जाताना रात्री शतपावली करणाऱ्या येथील रहिवाशांनाही कोयता दाखवत शिवीगाळ केली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज मिळवत तपास सुरू केला.

### लिपिक पदाच्या भरतीसाठी पुन्हा मनपाची जाहिरात

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका प्रशासनाने 'कार्यकारी सहायक' (लिपिक) या संवर्गातील १ हजार ८४६ जागांसाठी नव्याने जाहिरात दिली आहे. या भरतीसाठी दहावी व पदवी परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण ही अट आता काढून टाकण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पदवी परीक्षेत ४५ टक्के गुणांची अट देखील रद्द करण्यात आली आहे. उमेदवारांना ११ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येणार आहे.मुंबई महानगरपालिकेत लिपिक पदासाठी मोठी भरती होणार आहे. 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम: लिपिक) या संवर्गातील १ हजार ८४६ जागा सरळसेवेने भरण्यासाठी प्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली आहे. या जागांसाठी यापूर्वी २० ऑगस्ट रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या परिक्षेसाठी अर्ज भरण्यासाठी उमेदवार दहावी आणि पदवी परीक्षा पहिल्या प्रयत्नात किमान ४५ टक्के गुण घेऊन पास झालेला असावा अशी अट घालण्यात आली होती.

# आपला नमस्कार बहुराष्ट्रीय झाला, 'AI म्हणजे- अमेरिकन इंडियन'

**वृत्तसंस्था**
**■ न्यूयॉर्क**

पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या अमेरिका दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रविवारी न्यूयॉर्कमध्ये भारतीय वंशाच्या लोकांना संबोधित करत आहेत. न्यूयॉर्कमधील नासॉ वेटरन्स कॉलेजियममध्ये पोहोचल्यानंतर हजारो लोकांनी मोदी-मोदीच्या घोषणा दिल्या. यानंतर अमेरिकेचे राष्ट्रगीत आणि नंतर भारताचे राष्ट्रगीत वाजविण्यात आले.यानंतर मोदी म्हणाले, "आपला नमस्कार

### भारतीयांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया

हा बहुराष्ट्रीय, राष्ट्रीय ते जागतिक झाला आहे." मोदी म्हणाले की, मी जेव्हा मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान नव्हतो तेव्हा अनेक प्रश्न घेऊन या पृथ्वीवर यायचो. कोणतेही पद भूषवले नव्हते, अमेरिकेतील 29 देशांना भेटी दिल्या होत्या. मोदी म्हणाले, 'मला नेहमीच भारतीय डायस्पोराची क्षमता समजली आहे. मी कोणत्याही पदावर नसतानाही ते मला समजले आहे, आजही ते मला समजते. तुम्ही सर्व नेहमीच माझ्यासाठी भारताचे सर्वात मजबूत ब्रँड ॲम्बेसेडर आहात. म्हणूनच मी तुम्हा सर्वांना राष्ट्रदूत म्हणतो.'



***तुम्ही सातासमुद्रापार तरी भारताच्या जवळ आहात***
*अमेरिकेतील अनिवासी भारतीयांना उद्देशून मोदी म्हणाले, तुम्ही अमेरिकेला भारताशी आणि भारताला अमेरिकेशी जोडले आहे. तुमची कौशल्य, तुमची प्रतिभा, तुमची बांधिलकी, याची कोणतीही स्पर्धा नाही.तुम्ही सातासमुद्रापार आला असाल, पण कोणताही समुद्र इतका खोल नाही की तो तुमच्या हृदयात असलेल्या भारताला तुमच्यापासून हिरावून घेऊ शकेल.*

***क्वाड नेत्यांसमोर मोदींचे नाव विसरले बायडेन***
*अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन शनिवारी डेलावेअरमध्ये क्वाड समिटनंतर झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचे नाव विसरले. यावेळी मंचावर पंतप्रधान मोदी, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा हेही उपस्थित होते.*

***अमेरिकन स्पेस फोर्स भारतात उभारणार सेमीकंडक्टर प्लॅन्ट***
*याआधी त्यांनी बायडेन आणि क्वाड समिटसोबतच्या बैठकीला हजेरी लावली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या भेटीत भारत आणि अमेरिका यांच्यात दोन महत्त्वाचे करार झाले आहेत. अमेरिकेचे स्पेस फोर्स भारतात सेमीकंडक्टर प्लॅन्ट उभारणार आहे.यामध्ये बनवलेल्या सेमीकंडक्टर चिप्सचा वापर भारत आणि अमेरिकेच्या सशस्त्र दलांना होणार आहे. याशिवाय अमेरिकेने भारताला 31 MQ-B ड्रोन देण्याची घोषणा केली आहे. सीमेवर पाळत ठेवण्यासाठी याचा वापर केला जाईल.*



# जात ,धर्म काही असला तरी शेवटी आपण भारतीय !

## शरद पवार यांचे आरक्षण आंदोलनावर परखड मत

**प्रतिनिधी**
**■ पुणे**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले .आरक्षण प्रश्नाशी संबंधित घटकांनी सामंजस्याची भूमिका घेण्याची गरज आहे. जात धर्म काही असला तरी शेवटी आपण भारतीय आहोत, असे परखड मत शरद पवारांनी मांडले आहे. तसेच सरकारने देखील याबाबत विलंब लावू नये, असा सल्ला देखील त्यांनी सरकारला दिला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबद्दल बोलताना शरद पवार म्हणाले, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे तिन्ही पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवणार आहेत. तीन पक्ष एकत्र लढताना त्यावेळी कुठल्याही एका जागेवर तिघांपैकी कोणी ती जागा लढवावी याबाबतचा निर्णय आणि एकवाक्यता करावी लागेल, ती प्रक्रिया सध्या सुरू आहे. गेल्या तीन दिवसांपासून तिन्ही पक्षांचे नेते मुंबईत आहेत. जागा वाटपाचा निर्णय झाल्यावर प्रत्येक पक्ष कोणता उमेदवार द्यायचा यावर विचार करेल, अशी माहिती शरद पवारांनी दिली आहे.

दिल्लीत अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाच्या आतिशी या दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत. यावर देखील शरद पवारांनी भाष्य केले आहे. शरद पवार म्हणाले, अरविंद केजरीवाल चांगले काम करत होते. केजरीवाल यांना एका विशिष्ट स्थितीत कॉर्नर करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले गेले. यानंतर केजरीवाल यांनी राजीनामा दिला.

***आरक्षणप्रश्नी सर्वांनीच सामंजस्याची भूमिका घ्यावी***
*राज्यात सुरू असलेल्या आरक्षण मुद्यावर बोलताना शरद पवार म्हणाले, आरक्षणामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे, मात्र तणाव होण्याचे कारण नाही, शेवटी आपण सगळे जात धर्म काही असली तरी भारतीय आहोत. महाराष्ट्राचे घटक आहोत. आपल्या सगळ्यांमध्ये सामंजस्य कसे करता येईल याबाबतची भूमिका या क्षेत्रात नेतृत्व करतात त्यांनी घेतली पाहिजे. याच सोबत राज्य सरकारने देखील या प्रश्नांना विलंब लावू नये, लोकांना विश्वासात घ्या आणि त्याची पूर्तता करून वातावरण चांगले कसे राहील याची काळजी घ्यावी, असा सल्ला शरद पवारांनी सरकारला दिला आहे.*

# 75 वर्षांचा नियम मोदींना लागू होणार का?

## अरविंद केजरीवालांचा भाजप, संघावर निशाणा

**वृत्तसंस्था**
**■ नवी दिल्ली**

आम आदमी पक्षाचे (आप) सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील जंतर मंतरवर आयोजित 'जनता की अदालत' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. तसेच, याचसोबत भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वादाच्या चर्चांवर आपले मत मांडले. अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्री पद सोडल्यानंतर मोदी सरकारवर हल्लाबोल केला.



यावेळी त्यांनी, आरएसएस आणि भाजपचा 75 वर्षांचा निवृत्तीचा नियम नरेंद्र मोदींना लागू होत नाही का?" असा सवाल केला. दरम्यान, इंडिया आघाडीचे घटकपक्ष असलेला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीदेखील, "वयाच्या 75व्या वर्षी नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावरून पायउतार होतील. त्याआधी ते आपले सर्व हट्ट पुरवून घेत आहेत." असे म्हणत निशाणा साधला होता.

आपच्या 'जनता की अदालत' कार्यक्रमात अरविंद केजरीवाल म्हणाले की, "अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची सुरुवात 4 एप्रिल 2011 रोजी झाली. आम्ही प्रामाणिकपणे सरकार चालवत होतो आणि जनतेला सुविधा देत होतो. मोफत पाणी आणि वीज, महिलांसाठी मोफत बस, तसेच ज्येष्ठांना मोफत तीर्थयात्रा अशा अनेक सुविधा दिल्या. गेली 10 वर्षे प्रामाणिकपणे काम केल्यानंतर मोदींना वाटले की, जिंकायचे असेल तर प्रामाणिकपणावर प्रहार केला पाहिजे. त्यामुळेच त्यांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे खोटे आरोप केले." असा दावा त्यांनी यावेळी केला.

# श्रीलंकेच्या राष्ट्रपतीपदी अनुरा दिसानायके

## डाव्या विचारसरणीचे अनुरा 10वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेणार

**वृत्तसंस्था**
**■ कोलंबो**

श्रीलंकेतील राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत डावे नेते अनुरा कुमार दिसानायके विजयी झाले आहेत. अल जझीराच्या वृत्तानुसार, निवडणूक आयोगाने त्यांचा विजय घोषित केला आहे. ते उद्या राष्ट्रपतीपदाची शपथ घेऊ शकतात. ते देशाचे 10 वे राष्ट्रपती असतील.

श्रीलंकेत 21 सप्टेंबर रोजी निवडणुका झाल्या. श्रीलंकेच्या निवडणूक इतिहासात कोणत्याही उमेदवाराला 50% मते न मिळाल्याची ही पहिलीच वेळ होती. यानंतर दुसऱ्या फेरीची मतमोजणी झाली. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत दिसानायके आणि सजिथ प्रेमदासा यांना सर्वाधिक मते मिळाल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.



यानंतर या दोन उमेदवारांमध्ये अंतिम लढत झाली. श्रीलंकन वेबसाइट डेली मिररच्या मते, पहिल्या फेरीत अनुरा दिसानायके यांना सुमारे 42.3% मते, सजिथ प्रेमदासा यांना 32.8% मते, रानिल विक्रमसिंघे यांना 17.3% मते मिळाली.

***आता भारत विरोध मावळलाय***
*अनुरा कुमारा दिसानायके या डाव्या पक्षाच्या जनता विमुक्ती पेरामुना (JVP) चे नेते आहेत. एनपीपी आघाडीकडून ते राष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत. जेव्हीपी पक्ष भारताच्या विरोधासाठी ओळखला जातो. 1980 च्या दशकात भारताने श्रीलंकेत एलटीटीईला सामोरे जाण्यासाठी शांतता रक्षक दल पाठवण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा जेव्हीपीने विरोध केला होता. अलिकडच्या वर्षांत JVP ने आपली भारतविरोधी भूमिका बदलली आहे. मात्र, अनुरा यांनी निवडणुकीपूर्वी भारतीय कंपनी अदानीविरोधात वक्तव्य करून नवा वाद सुरू केला आहे. JVP नेत्याने अलीकडेच 21 सप्टेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजय मिळवल्यास श्रीलंकेतील अदानी समूहाचा पवन ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे.*

# शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी आपटेला 26 लाख, बाकी राणेंच्या प्रचारासाठी खर्च



## ठाकरे सेनेचे आमदार वैभव नाईक यांचा खळबळजनक आरोप

**प्रतिनिधी**
**■ सावंतवाडी**

मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील पुतळा कोसळल्याप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे शिवसेनेचे आमदार वैभव नाईक यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. मालवणमधील शिवरायांचा पुतळा बनवण्यासाठीच्या पैशाचा वापर नारायण राणेंच्या लोकसभा प्रचारासाठी करण्यात आल्याचा खळबळजनक आरोप आमदार नाईक यांनी केला.

वैभव नाईक म्हणाले, पाच ते सहा दिवसांनी निलेश राणे पुतळा कोसळला त्यात माझा (वैभव नाईक) हात असल्याचे पुरावे देतो म्हणाले. मात्र, आता एक महिना झाला तरी ते तसे पुरावे देऊ शकलेले नाहीत.असे आरोप जनतेचे लक्ष अन्यत्र वळवण्यासाठीच केले जातात. नौदलाच्या कार्यक्रमात मोदींच्या हेलिकॉप्टरमध्ये इंधन देखील जिल्हा नियोजनच्या पैशातून टाकले आहे असा गंभीर आरोप आमदार नाईक यांनी केला.

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौदल दिनाच्या दिवशी या पुतळ्याचे लोकार्पण केले होते. मात्र, 26 ऑगस्टला ब्राँझचा हा 28 फुटी पुतळा कोसळला होता. यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती.

***एकाच कामासाठी नौदल आणि जिल्हा नियोजनकडून खर्च कसा?***
*शिल्पकार जयदीप आपटे याला महाराजांचा पुतळा बनवण्यासाठी आतापर्यंत एकूण 26 लाख रुपये देण्यत आले आहेत . त्यामुळे या कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. तर जिल्हा नियोजन नमधून 5, 54, 35,000 रुपये नौदल दिनाला खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन आणि नौदल दोन्हीकडून एकाच कामासाठी पैसे खर्च झाल्याचे दाखवून भ्रष्टाचार केला आहे.एकाच कामासाठी दोघांकडून खर्च कसा ,असा सवाल आमदार वैभव नाईक यांनी केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारल्यावर नौदलाने जो कार्यक्रम मालवणमध्ये केला त्या कामाच्या पैशातून नारायण राणेंच्या लोकसभेच्या निवडणुकीत पैसे वाटप करण्यात आले आहे,असा खळबळजनक आरोप आमदार नाईक यांनी शेवटी केला.*

# बंगालमधील पूर मानवनिर्मित!

## पंतप्रधानांना दुसरे पत्र लिहीत ममतांचा आरोप

**■ कोलकाता**

पश्चिम बंगालमधील पुरावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान मोदींना आणखी एक पत्र लिहिले आहे. 2 दिवसांत लिहिलेल्या दुसऱ्या पत्रात ममतांनी आरोप केला आहे की, दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनने त्यांच्याशी सल्लामसलत न करता पाणी सोडले, त्यामुळे बंगालचे जिल्हे पाण्याखाली गेले.

याआधी ममता यांनी 20 सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्रही लिहिले होते. ज्यामध्ये त्यांनी दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन (DVC) अंतर्गत धरणांमधून 5 लाख क्युसेक पाणी सोडल्यामुळे बंगालमध्ये पूर आल्याचा आरोप केला होता.येथे, बंगाल सरकार आणि केंद्र यांच्यात सुरू असलेल्या शब्दयुद्धाच्या दरम्यान, राज्याचे विद्युत सचिव शांतनु बसू यांनी DVC बोर्डाचा राजीनामा दिला आहे. बसू यांच्याशिवाय बंगालच्या पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्यांनीही नियमन समितीचा राजीनामा दिला आहे.दामोदर व्हॅली रिझर्व्हायर रेग्युलेशन कमिटी मध्ये केंद्रीय जल आयोग, पश्चिम बंगाल, झारखंड आणि दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी असतात.



# चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताला 2 सुवर्णपदके



## 97 वर्षांत प्रथमच महिला व खुल्या गटात जेतेपद

**■ बुडापेस्ट**

चेस ऑलिम्पियाडमध्ये खुल्या आणि महिला गटात भारताने ऐतिहासिक सुवर्णपदके जिंकली आहेत. ऑलिम्पियाडच्या 97 वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारताने दोन्ही प्रकारांमध्ये प्रथम स्थान मिळविले. 11व्या फेरीच्या खुल्या गटात भारताने स्लोव्हेनियाचा 3.5-0.5 असा पराभव केला. त्याचवेळी महिला संघाने शेवटच्या फेरीत अझरबैजानचा 3.5-0.5 अशा फरकाने पराभव केला.

खुल्या गटात भारताने 10व्या फेरीनंतरच पहिले स्थान निश्चित केले होते, मात्र 11व्या फेरीनंतर महिला संघाचे सुवर्णपदक निश्चित झाले. कारण दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कझाकिस्तान संघाने अमेरिकेविरुद्ध 2-2 अशी बरोबरी साधली होती. यामुळे भारत 19 गुणांसह पहिल्या तर कझाकिस्तान 18 गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. बुडापेस्ट, हंगेरी येथे 10 सप्टेंबरपासून चेस ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात आले होते.

(सविस्तर वृत्त पान 7 वर )

# नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे अधिकृत करणार !

## प्रकल्पग्रस्तांसाठी मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा, अध्यादेश काढणार

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे अधिकृत करण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या घरांबाबत सरकारने अध्यादेश तयार केला त्यावर मुख्यमंत्री म्हणून स्वाक्षरी केली आहे. लवकरच या अध्यादेशाची घोषणा केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याची अनेक वर्षांची मागणी आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबईकरांनी ही आनंदाची बातमी दिली आहे. कोळी महासंघाचे नेते रमेश पाटील यांच्या प्रयत्नाने ऐरोलीत मार्गी लागलेल्या कोळी भवनाचा भूमिपूजन सोहळा रविवारी (22 सप्टेंबर) झाला.



यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री प्रवीण दरेकर, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, खासदार नरेश म्हस्के, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीवर टीकेची झोड उठवली. मविआच्या काळात विकासकामे होत नव्हती. मविआने चौकशीचा ससेमिरा लावत बंद केलेली विकासकामे महायुतीचे सरकार आल्यानंतर पुन्हा सुरू केली. महायुतीच्या काळामध्ये अटल सेतू, वाढवण बंदर, मुंबईला जोडणारा कोस्टल रोड, नवी मुंबई मेट्रो, आंतरराष्ट्रीय विमानतळ अशा विकासप्रकल्पाला मूर्त स्वरुप देण्याचे काम केले आहे. त्यामुळे हे सरकार जनतेची कामे करणारे विकासाभिमुख सरकार असल्याचे शिंदे म्हणाले. कोळी समाजाच्या जातीच्या दाखल्यासाठी अभ्यास गट सरकारने नेमला असून लवकरच त्यावर निर्णय होईल. असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

***आगरी- कोळी समाजाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - फडणवीस***



*उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशात भाजपाचे सरकार आल्यांनतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तर वर्षानंतर कोळी समाजातील मच्छीमारांसाठी केंद्र सरकारने स्वतंत्र महामंडळ उभारण्याचा निर्णय घेतला. आगरी कोळी समाजाच्या समस्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटीबध्द असल्याचे ग्वाही दिली. कोळी भवनासाठी सरकारने 20 कोटींचा निधी दिल्याचे फडणवीस म्हणाले. गरज पडल्यास आणखी 10 कोटींची निधी देऊ, असेही ते म्हणाले. सिडकोकडून हा भूखंड मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकार्य केल्याने कोळी भवन साकारणार असल्याचे रमेश पाटील यांनी सांगितले. यावेळी आमदार गणेश नाईक व आमदार मंदा म्हात्रे यांनी घरांसोबतच सरसकट जमिनीही प्रकल्पग्रस्तांच्या नावावर कराव्यात, अशी मागणी केली.*

## मुंबईत सोने, चांदीची तस्करी; दोन कोटींचा मुद्देमाल जप्त

**मुंबई :** मुंबईत सोने आणि हिऱ्यांची तस्करी केल्याची मोठी बातमी समोर आली आहे. शनिवारी (ता. 21 सप्टेंबर) रात्री मुंबई कस्टमने दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये तब्बल 2.286 किलो सोने आणि हिरे जप्त केले आहेत. यामध्ये अंदाजे 1.58 कोटी रुपयांचे सोने तर 1.54 कोटी रुपयांचे हिरे जप्त करण्यात आले आहेत. या दोन्ही प्रकरणात तीन प्रवाशांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल 3.12 कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दुबईहून मुंबईमध्ये येणाऱ्या एका प्रवाशावर संशय आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून तस्करीचा माल जप्त करण्यात आला. यामध्ये 24 कॅरेट सोन्याचे 12 बार म्हणजेच 1400 ग्रॅम वजनाचे अंदाजे 97 लाख रुपयांचे सोने जप्त करण्यात आले. हे सोने संबधित आरोपीने आपल्या पॅन्टच्या बेल्टजवळ लपवले होते. यावेळी त्याने सांगितले की, हे कृत्य त्याने त्याचा विमानात असलेल्या एका प्रवाशाच्या सांगण्यावरून केले. त्याच्यासोबत प्रवास करणाऱ्या सहप्रवाशाने ही मान्य केले आहे. दोन्ही प्रवाशांना अटक करण्यात आली असून पोलिसांकडून त्यांची पुढील चौकशी केली जात आहे.



## थोडक्यात

### पोमणमधून वयोवृद्ध इसम बेपत्ता

**वसई :** वसई पूर्वेकडील पोमण हद्दीतील महाजनपाडा, रॉयल इंडस्ट्रिअल या ठिकाणी राहणारे अशोक बबन शेलार (65) हे दिनांक 7 सप्टेंबर 2024 रोजी सकाळच्या सुमारास बेपत्ता झाले आहेत. त्यांच्या नातेवाईकांनी अशोक यांचा सर्वत्र शोध घेतला मात्र त्यांचा कुठेच थांगपत्ता लागला नाही. अखेरीस त्यांच्या नातेवाईकाने नायगाव पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली आहे. त्यांचा रंग सावळा, उंची 5 फूट 2 इंच, केस काळे व पांढरे बारीक केलेले, दाढी पांढरी, सडपातळ बांधा, अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट, काळया रंगाची पॅन्ट, पायात काळ्या रंगाची चप्पल असे त्यांचे वर्णन असून कुणाला त्यांच्याबाबत काहीएक माहिती असल्यास त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या 9967912758,9561262425 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वीज उपकेंद्रांवर करणार 2,978 कोटींचा खर्च

**मुंबई :** मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा करता यावा, म्हणून महावितरणने कंबर कसली आहे. त्यानुसार वीजवितरणात शेवटच्या टप्प्यावर महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या २,७८२ वीज उपकेंद्रांचे बळकटीकरण केले जाणार आहे. त्यासाठी २,९७८ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.महावितरणचे राज्यभरात सुमारे पावणेतीन कोटी वीज ग्राहक आहेत. त्यात कृषिपंपधारक शेतकऱ्यांचा समावेश असून त्यांना दिवसा आणि रात्री अशा दोन टप्प्यांत १४-१६ तास वीजपुरवठा केला जातो. त्यामुळे रात्री होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होते. त्यामुळे मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यावर महावितरणने भर दिला आहे. कृषिपंपाला सौर कृषिवाहिनीच्या माध्यमातून वीजपुरवठा केला जाऊ शकतो, असे सुमारे २,७८२ वीज उपकेंद्रे महावितरणने निश्चित केली आहेत. त्यांचे बळकटीकरण केले जाणार आहे. त्यात ४७० उपकेंद्रांची क्षमता वाढवावी लागणार आहे, तर २,३१२ उपकेंद्रांत पायाभूत यंत्रणा सक्षम करावी लागणार आहे. हे काम झाल्यानंतर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे.

### वोकल फॉर लोकलला मुंबईकरांचा वाढता प्रतिसाद

**मुंबई :** दादरच्या शिवाजी पार्क येथे भारतातील स्थानिक कलाकारांच्या हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तीनदिवसीय प्रदर्शनात खरेदीसाठी वेगवेगळ्या आकर्षक वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. वोकल फॉर लोकल हे मनावर बिंबविण्यासाठी हे प्रदर्शन इथे भरवण्यात आले. यातून वेगवेगळ्या अनेक छोट्या-मोठ्या वस्तू खरेदी करण्याची संधी इथे उपलब्ध झाली आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# जूचंद्र गाव धोक्याच्या वळणावर




प्रतिनिधी
■ वसई

रांगोळी कलावंतांचे गाव म्हणून साता समुद्रापार ओळख मिळालेले, नाट्य संस्कृती आणि कलाकारांचे गाव म्हणून लौकिक असलेल्या जूचंद्र गावाला परप्रांतीय नागरिकांच्या वाढत्या लोकसंख्येचा वेढा पडला आहे. हा वेढा इतका मोठा ठरला आहे की यात परप्रांतीय 75 टक्के आणि स्थानिक आगरी समाज केवळ 25 टक्के उरला आहे. काही स्थानिक राजकीय नेत्यांच्या स्वार्थलोलूप वृत्तीमुळे या भागात परप्रांतीयांचे प्रस्थ वाढत असून त्यांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक आगरी समाजाची वस्ती असलेला आगरी समाज धोक्याच्या वळणावर आला आहे.

आगरी लोकवस्ती असलेल्या जूचंद्र गावाने आपला कलेचा वारसा साता समुद्रापार पोहोचवला, त्याच गावाला सध्या चारी बाजूने परप्रांतीयांचा विळखा पडला आहे. खाजन तसेच भातशेतीच्या जागेत मोठ्या प्रमाणात अनधिकृत चाळी उभ्या करून त्यात परप्रांतीय नागरिकांना पथारी पसरू देण्यास स्थानिकांनीच हातभार लावल्याने आगरी संस्कृती आणि परंपरा यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. जूचंद्र परिसरातील सोमेश्वर नगर, हसोबा नगर, म्हात्रे वाडी, परेरा नगर, गणेश नगर आदी भागात मोठ्या प्रमाणात चाळी वाढल्या आहेत.

या भागात युपी, बिहारी नागरिकांची वस्ती वाढत असून यात गुन्हेगारांचे प्रमाणही अधिक आहे. स्थानिकांच्या सणांपेक्षा परप्रांतीयांचे सण, वेगवेगळ्या परंपरा यामुळे जुचंद्र गावच्या अस्सल आगरी संस्कृती व परंपरेला नख लावण्याचे काम काही स्थानिकांनी केले आहे. येत्या काही वर्षात ही संख्या अधिक वाढून केवळ 25 टक्के उरलेल्या जुचंद्र गावात परप्रांतीयांचे प्रस्थ वाढून या गावाच्या अस्तित्वाला, आगरी समाजाच्या संस्कृती आणि परंपराच धोक्याच्या वळणावर आल्या आहेत. यासाठी गावातील होतकरू तरुणांनी राजकारण बाजूला ठेऊन एकत्र येऊन गाव वाचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

## वसईत भात कापणीला आठवड्यात सुरुवात !

### यंदा समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ

प्रतिनिधी
■ वसई

समाधानकारक झालेल्या पावसाने वसईतील शेतकऱ्यांच्या ओंजळीत यावेळेस जास्त उत्पन्न भातशेतीतून पडणार आहे. या महिन्याच्या शेवटाला भातकापणीचा हंगाम सुरू होणार असून ऑक्टोबर महिन्याच्या शेवटापर्यंत भातकापणी हंगाम पूर्ण होणार आहे. त्यासाठी भातकापणीला आवश्यक असणाऱ्या साहित्याची जमावाजमव करण्याचे काम शेतकऱ्यांकडून सुरू आहे.

यंदा भातशेतीला मुबलक पावसामुळे चांगला फायदा झाला आहे. पावसाच्या चांगल्या प्रमाणामुळे हलवार तसेच गरवार अशी दोन्ही प्रकारची पिके चांगली आली आहेत. सध्या पितृपक्ष सुरू झाला आहे. येत्या 2 ऑक्टोबरनंतर पितृपक्ष संपून नवरात्रोत्सव सुरू होत आहे. या सणाच्या धामधुमित वसईतील शेतकरी राजा शेतात भातकापणीला उतरणार आहे. तसेच यंदा समाधानकारक पावसामुळे कोठेही भातशेतीवर बगळ्या किंवा करपासारख्या रोगाचा प्रादुर्भाव पडला नसल्याची माहिती कृषी अधिकाऱ्यांनी दिली. भातपिक चांगले आल्याने यंदा भातशेतीतून मिळणाऱ्या चांगल्या उत्पन्नामुळे



शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे. सध्या भातकापणीसाठी आवश्यक असणारी विळी पाजवून घेण्यासाठी (धार लावून घेण्यासाठी) शेतकऱ्यांची लोहारांकडे गर्दी दिसून येत आहे. तसेच भात लागवडीसाठी पालघरच्या दुर्गम भागातून आलेल्या शेतमजुरांना पुन्हा भातकापणीसाठी पाचारण करण्यात येणार आहे. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी भात कापणीचा हंगाम पूर्ण होणार असून त्यानंतर भात झोडणी, मळणी व गिरणीतून भात भरडून आणणे अशी कामे शेतकऱ्यांकडून केली जाणार आहेत.

## वसई तालुक्याला अंमली पदार्थ तस्करीचा विळखा

### कारवाईसाठी उबाठाचे पोलीस विभागाला 26 सप्टेंबरपर्यंत अल्टीमेटम

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार परिसरात अमली पदार्थ तस्करी वाढली असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे. अमली पदार्थ विक्री करणाऱ्या परदेशी नागरिकांवर 26 सप्टेंबरपर्यंत कारवाई करावी,अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

वसई-विरार शहरात मागील काही वर्षांत परदेशी नागरिकांचे वास्तव्य वाढले आहे. हे परदेशी नागरिक अमली पदार्थ तस्करीत सक्रिय आहेत. या सगळयाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजावर उमटत आहेत. वाढत्या अमली पदार्थ विक्री आणि सेवनामुळे युवापिढी व्यसनाधीन बनत असून शाळा-कॉलेज आणि अन्य सामाजिक-धार्मिक केंद्र परिसरातही अमली पदार्थ विक्री आणि त्यांचे सेवन बिनदिक्कत होताना दिसत आहे.



या वाढत्या अमली पदार्थ तस्करी आणि विक्रीवर किंबहुना परदेशी नागरिकांच्या वास्तव्यावर आणि त्यांच्या माध्यमातून होणाऱ्या अमली पदार्थ विक्री आणि तस्करीवर नियंत्रण मिळविण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरताना दिसत आहेत. परिणामी अमली पदार्थ विक्री व व्यसनाधिनतेला अधिकच जोर आलेला आहे. ही गंभीर व समाजविघातक बाब असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे.कारवाईकरता 26 सप्टेंबरची मुदत देण्यात आली आहे.

## वालीव विभागात अभियंत्यांची भाऊगर्दी
## ...तरीही अनधिकृत बांधकामांची पैदास सुरुच

### पालिकेने हे अभियंते पोसायला ठेवलेत का? ठाकरे गटाच्या काकासाहेब मोटे यांचा संतप्त सवाल

प्रतिनिधी
■ वसई

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव विभागातील अभियंत्यांची भाऊगर्दी आणि तरीही भूमाफियांच्या टोळधाडी अनधिकृत बांधकामांचा आलेख उंचावू लागल्याने अभियंते पालिका प्रशासनाने पोसायला घेतले आहेत का? असा संतप्त सवाल उध्दव ठाकरे गटाचे वसई उपतालुकाप्रमुख काकासाहेब मोटे यांनी उपस्थित केला आहे.

वालीव 'जी' विभागात अनधिकृत बांधकामांचा वेग मोठा आहे. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवायला तीन ठेका अभियंता या विभागात कार्यरत आहेत. दरम्यान, साहिल सावे, कौस्तुभ तामोरे व अरुण सिंग असे हे तीन ठेका अभियंता आधीच निष्क्रिय व भूमाफिया धार्जिणे असताना या ठेका अधिकाऱ्यांना या विभागात अनधिकृत बांधकामांवर देखरेख ठेवायला आणले आहे की अनधिकृत बांधकामांतून बिदाग्या वसूल करायला आणले आहे, असा खोचक सवाल काकासाहेब मोटे यांनी पालिकेला निवेदनातून केला आहे. वालीव विभागात तीन ठेका अभियंता, एक अतिक्रमण अधिकारी (विजय नडगे), दहा सहाय्यक कर्मचारी, एक सहाय्यक आयुक्त, ५० मजूर कर्मचारी तसेच त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी १ उपायुक्त व एक अतिरिक्त आयुक्त इतका मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. मोठा फौजफाटा असतानाही वालीवमध्ये अनधिकृत बांधकामांचा विस्फोट झाला आहे. याला जबाबदार कोण? असा सवाल मोटे यांनी उपस्थित केला आहे.

वालीव विभागात अनधिकृत बांधकामांची बजबजपुरी निर्माण होऊन त्यातून पालिकेचा लाखोंचा महसूल चोरी झाला आहे. आरक्षित भूखंडांचा राजरोसपणे बळी दिला जात आहे. पालिका आयुक्त त्यावर मौनव्रत धारण करून असल्याने काकासाहेब मोटे यांनी चिंता व्यक्त केली आहे. वालीव विभागासाठी एकतर एकच ठेका अभियंता नियुक्त करावा, अन्यथा हा विभागच बंद करावा, अशी संतप्त मागणी ठाकरे गटाचे वसई उपतालुकाप्रमुख काकासाहेब मोटे यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना केलेल्या निवेदनात केली आहे.

## गोरेगावमधील कथित 'एमएमआरडीए' भ्रष्टाचाराची चौकशी सुरु

दत्तात्रय जाधव
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)तर्फे प्रकल्पबाधित लोकांसाठी राम मंदिर गोरेगाव (पश्चिम) येथे सदनिका (घरे) बांधल्या आहेत. संबंधित अधिकारी व दलाल (मध्यस्थी) यांच्या संगनमताने भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने अप्पर जिल्हाधिकारी रोकडे यांना विचारले असता या घोटाळयाची चौकशी करण्याचे निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, भिवंडी-ठाणे- कल्याण प्रकल्पबाधित पंधरा ते वीस लोकांना आज दलालांच्या सहाय्याने सिग्मा 1 मध्ये सदनिका देणार असल्याचे समजते. परंतु ठाणेमधील प्रकल्पबाधित लोकांना त्याच परिसरात घरी देण्यात यावी. तसे न केल्यास आम्ही हा प्रयत्न हाणून पाडू, असा इशारा काँग्रेसच्या मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे व गौरव राणे यांनी केली आहे. दरम्यान, ज्यांना सिग्मा वन इमारतीतील घरे अलॉटमेंट झाली आहे, त्यांना प्रत्यक्ष बोलवून त्यांची खरे नाव, आधार कार्ड व इलेक्शन कार्डची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

गोरेगाव पश्चिम येथील राम मंदिरच्या ओशिवरा जिल्हा केंद्र (ओडीसी) येथे एमएमआरडीएतर्फे प्रकल्पबाधित व जवळच असलेल्या धोकादायक स्थितीत असलेल्या पी 5 मधील रहिवाशांना सिग्मा 1 इमारतीमध्ये हलवण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्त व उपायुक्तांनी घेतला होता. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी न करता अधिकाऱ्यांच्या मदतीने दलालांनी 105, 205, 305, 405, 505, 605, 705, 1005 ही घरे प्रत्येकी 40 लाखांना विकली आहेत. सर्वसामान्यांच्या करातून उभारणाऱ्या एमएमआरडीच्या इमारतीतील घरे विकून अधिकाऱ्यांनी शासनाची फसवणूक केली आहे. दरम्यान, सिग्मा 1 या इमारतीमध्ये चार ते पाच एजंटची घरे असून 40 ते 50 लाखाला ती घरे विकणार असल्याचे समजते. या सर्व घरांचा पंचनामा करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रकल्पबाधित लोकांसाठी बांधलेल्या सिग्मा 1 इमारतीतील घरे ज्या लोकांना अलॉटमेंट झाली आहेत, ते सर्वजण बोगस असल्याचा आरोपही काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे.

***अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर दलालांचा वावर***

*सिग्मा 1 इमारतीमधील प्रकल्पबाधितांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीत भ्रष्टाचार झाल्याचे बातमी वृत्त मानसने प्रकाशित केली होती. यासंदर्भात अप्पर जिल्हाधिकारी रोकडे यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी दि. 19 सप्टेंबर रोजी गुरुवारी बांद्रा (पूर्व) येथील कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी त्यांच्या कार्यालयाबाहेर दलालांचा वावर दिसला. अप्पर जिल्हाधिकारी रोकडे यांच्या कार्यालयाबाहेर दलाल का उभे होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीने रोकडेंच्या सदर गंभीर बाब निदर्शनास आणून दिली.*

## आरटीओ कर्मचारी संघटनेची परिवहन आयुक्तांशी झालेली चर्चा फिस्कटली

### मंगळवारपासूनचा बेमुदत संप अटळ

■ मुंबई

आरटीओ कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात परिवहन आयुक्त यांनी त्यांचे दालनात संघटना प्रतिनिधींसह गुरूवारी बैठक बोलावली होती. पण केवळ आश्वासने देऊन वेळ मारुन नेण्याचा प्रशासनाचा उद्देश असल्याचे दिसून आल्यामुळे संघटना प्रतिनिधी संतप्त झाले. जोपर्यंत प्रत्येक मागणी संदर्भातील कार्यवाही संबंधात, लेखी स्वरुपात निर्णय-पत्र दिले जात नाही, तोपर्यंत संपाबाबत कोणताही पुनर्विचार न करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. ही "चर्चा फिसकटल्यामुळे जाहीर केलेला मंगळवार. २४ सप्टेंबर २०२४ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार पक्का केला आहे. असे मोटार वाहन विभाग (RTO) कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी सांगितले. महसूल विभागीय बदल्यांचे धोरण रद्द न करणे, विभागीय परीक्षेसारख्या संवेदनशील क्षेत्रात अनाकलनीय बेछूट बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील बहुतेक कर्मचारी हवालदिल झाले आहेत. या संप आंदोलनाची रितसर नोटीस परिवहन आयुक्त व अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) यांना देण्यात आली होती. म्हणून परिवहन आयुक्तांनी चर्चेसाठी त्यांच्या दालनात बोलावले होते.राज्यातील सर्व त्रस्त आरटीओ कर्मचारी कर्तव्य भावनेने, स्वतःच्या अस्तित्त्वासाठी संपात सहभागी होतील, असा ठाम निर्धार संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी व्यक्त केला.तर संघशक्तीचा नक्की विजय होईल असा दृढ विश्वास अध्यक्ष प्रकाश साटील यांनी व्यक्त केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **विजय कुमार राजाराम विचारे** यांच्या मालकीचा भाईदर (पु), नवघर रोड वरील साई बाबा नगर मध्ये **अंकित अपार्टमेंट** (सध्याचे नाव **मनदीप को. ऑप. हौ. सो. लि.**) या संस्थेमध्ये तळ मजल्यावर बी/००७ क्रमांकाची सदनिका आहे. ते दि. ०९/११/१९९३ ला मरण पावले. त्यांचा मुलगा प्रमोद विजयकुमार विचारे हे दि. २०/०७/२००५ ला मरण पावले. त्यानंतर दूसरा मुलगा विनोद विजयकुमार विचारे हा दि. ०९/०४/२००७ ला मरण पावला. त्यानंतर विजयकुमार विचारे यांच्या पत्नी स्मिता विजयकुमार विचारे या दि. ०४/०७/२०२१ ला मरण पावल्या. स्मिता विजयकुमार विचारे यांनी केलेल्या मृत्यूपत्रानुसार ठाणे सिविल कोर्टाने दि. १३/०२/२०२४ रोजी एम. ए. अर्ज क्र. ३०१/२०२३ मध्ये प्रोबेट दिले असून त्यानुसार वरील सदनिका शंकर लक्ष्मण पवार यांना देण्यात आलेली आहे व त्याने मनदीप को. ऑप. हौ. सो. लि. मध्ये वरील सदनिकेसाठी सभासदत्व देण्याची तसेच सदर सदनिकेचे मूळ शेअर सर्टिफिकेट गहाळ झाले असून डुप्लीकेट शेअर सर्टिफिकेट देण्याची त्याने मागणी केली आहे.

तरी वरील सदनिकेवर, त्याच्या करारनाम्यावर, त्याच्या शेअर सर्टिफिकेटवर, कुणाचाही हक्क, हितसबंध, गहाणवट, वारसाहक्क वगैरे असल्यास तसेच शंकर लक्ष्मण पवार यांना सभासदत्व देण्यास कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र. २, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईदर (पूर्व), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास कुणाचीही हरकत नाही असे समजून संस्था पुढील योग्य ती कारवाई करील याची नोंद घ्यावी.

कळावे,
**जॉन एम रॉड्रीक्स**
वकील
मो. नं. – ९८९२४०१३४९

## प्रज्ञा दया पवार यांची 'वंचित'च्या कार्यकर्त्यांकडून समाजमाध्यमावर अपशब्द वापरुन बदनामी

### या प्रवृत्तींचा स्त्री चळवळीतील लेखिका, कार्यकर्त्यांकडून जाहीर निषेध!

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्या देशात पुरुषी मानसिकतेने कोणत्याही स्त्रीला किंवा तिच्या भूमिकेला विरोध करताना तिच्यासाठी वाईट शब्द वापरून तिचा उपमर्द करणे हे सातत्याने चालत आलेलं आहे. याच पद्धतीने गेल्या काही दिवसात प्रख्यात मराठी कवयित्री-लेखिका, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ती डॉ. प्रज्ञा दया पवार यांना लक्ष्य केले जात आहे.

'वंचित बहुजन आघाडी' या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंबेडकरी विचारवंत आणि साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रावसाहेब कसबे, तसेच ॲड. असीम सरोदे यांच्या घरांपुढे निदर्शने केली. त्या संदर्भात प्रज्ञा दया पवार यांनी समाजमाध्यमावर या कृतीविरुद्ध नाराजी व्यक्त करणारी आपली भूमिका लिहिली होती. खरे तर त्यांची ही भूमिका मान्य नसलेल्यांनी त्याचा संवैधानिक भाषेत वैचारिक विरोध करायला हवा होता. पण तसे न करता प्रज्ञा दया पवार यांना, वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते म्हणवणारे काही पुरुष आणि काही स्त्रियादेखील अर्वाच्य भाषेत ट्रोल करत आहेत. पक्षाच्या काही कार्यकर्त्यांची भाषा तर इतकी खालच्या थरावर जाऊन पोहचली आहे की, ते 'स्त्रीचं चारित्र्य' ही पारंपरिक संकल्पना घेऊन प्रज्ञा दया पवार यांच्यावर वैयक्तिकरित्या प्रहार करत आहेत. हे अजिबात योग्य नाही.

एखाद्या राजकीय पक्षाने किंवा अराजकीय संघटनेने दुसऱ्या पक्षाच्या न पटणाऱ्या भूमिकांना संवैधानिक मार्गाने वैचारिक विरोध करणे हे गैर नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानातून हा असहमतीचा अधिकार, या देशातील प्रत्येक नागरिकाला दिलेला आहे. पण बाबासाहेबांचे वारसदार म्हणवून घेणाऱ्या पक्षातील काही कार्यकर्त्यांकडूनच जर याची पायमल्ली होत असेल आणि पक्षाचे प्रमुख पदाधिकारी हे सर्व शांत राहून बघत असतील, तर हे अतिशय खेदजनक आहे. या बाबतीत त्यांच्याच पक्षात कार्यरत असलेल्या काही महिला कार्यकर्त्यांनीही समाजमाध्यमावर जाहीर नाराजी व्यक्त केलेली आहे.

या देशातील कोणत्याही स्त्रीचा सन्मान अशा पद्धतीने पायदळी तुडवण्याचा प्रयत्न होत असेल तर आम्ही संविधानप्रेमी स्त्रिया सामूहिकरीत्या विरोध प्रकट करीत आहोत आणि या प्रवृत्तीचा जाहीर निषेध करत आहोत!

या पत्रकावर 1) हिरा बनसोडे(जेष्ठ कवयित्री) 2) उर्मिला पवार ( जेष्ठ लेखिका),3) हिरा पवार ( जेष्ठ लेखिका),4) राही भिडे (पत्रकार), 5) डॉ.माया पंडित 6) उल्का महाजन 7) नीरजा (कवयित्री)8) प्रतिमा जोशी (पत्रकार)9) डॉ. सिसिलिया कार्व्हलो 10) डॉ. श्यामल गरुड अशा विविध क्षेत्रातील ८० महिलांच्या सह्या आहेत

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 93**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ९३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## जागतिक कन्या दिनानिमित्त भारतरत्न देण्याची मागणी

**मुंबई :** जागतिक कन्या दिनानिमित्त महिला शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि बीएमसी शाळा ही मुंबईतील सर्वोत्कृष्ट शाळा असल्याचा आवाज उठवणारे समाजसेवक शिक्षणतज्ज्ञ चंद्रवीर बंशीधर यादव यांनी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याची मागणी गेल्या तीन दशकभरापासून करत आहेत. २०१५ मध्ये महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी वरळी येथे झालेल्या ओबीसी महासंघाच्या परिषदेत अशी घोषणा केली होती की, ते केंद्र सरकारकडून थोर समाजसुधारक महात्मा फुले यांना भारतरत्न देण्याची मागणी केली जाईल असे आश्वासन दिले होते. पण पुढे काहीच झालेले नाही.




# जगाला युद्ध नको बुद्ध हवाय - मुख्यमंत्री शिंदे

## बौद्ध भिक्षू व भंतेजींसाठी वर्षावर पार पडला चिवरदान, धम्मदान व भोजनदान सोहळा

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

जगात आज अनेक ठिकाणी संघर्ष आणि युद्धाची परिस्थिती असताना जगाला युद्ध नको बुद्ध हवाय, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षावर काल रविवारी वर्षावास या पवित्र महिन्यानिमित्त भंतेजींसाठी चिवरदान, धम्मदान व भोजनदान सोहळा पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, भिक्षू महासंघांच्या राज्यभरातून आलेल्या भंतेजींच्या उपस्थितीने आज वर्षावर प्रेमाचा आणि आशिर्वादाचा वर्षाव झाला आहे. गेली दोन वर्ष मुख्यमंत्री नव्हे तर कॉमन मॅन म्हणूनच जनसेवा करत आलोय. अनेक ठिकाणी संघर्षाची परिस्थिती असली तरी जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज आहे. हे आपण आचरणात आणले तर समाज, राज्य आणि देश सुखी झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



आज ज्ञान जरी खूप असले तरी बुद्धाचे तत्वज्ञान देखील तितकेच आवश्यक आहे, असे ते म्हणाले. दौलत मिली किसको तो धनवान बन गया, ताकद मिली किसको तो पहलवान बन गया, बाबासाहेब मिले मुझको तो इन्सान बन गया, अशी रचना सादर करत त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती आदर व्यक्त केला. राज्याचा कारभार तथागत गौतम बुद्ध यांची शिकवण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पया सोहळयाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादानाने आणि सामूहिक प्रार्थनेने झाली. यावेळी उपस्थितीत आदरणीय भंतेजींना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते चीवरदान, वस्त्रदान करण्यात आले. भंतेजींनी मुख्यमंत्री आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना धम्म आशिर्वाद दिले. यानंतर भंतेजींसाठी भोजनदानाचा सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, प्रवक्ते राहुल लोंढे, डॉ. राजु वाघमारे, अनिल गायकवाड उपस्थित होते.

ऑल इंडिया भिक्षू महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले की तथागत भगवान गौतम बुध्दाच्या काळात प्रसेनजित नावाचा राजा होता तोसुद्धा अशाच प्रकारे भोजनदान, धम्मदान करत होता. त्याची आज आठवण आम्हाला आली, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा मुख्यमंत्र्याच्या शासकीय निवासस्थानी असा हा भोजनदानाचा कार्यक्रम झाला याची इतिहासात नोंद होईल, असे गौरवोद्गार महाथेरो यांनी काढले. वर्षावर प्रथमच अशा प्रकारचा सोहळा आयोजित केल्याबद्दल भंतेजींनी आनंद व्यक्त केला.

# रायगड बँकेचे रूपांतर 'वटवृक्षात' करू

## आ. प्रविण दरेकरांनी व्यक्त केला विश्वास

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

रायगड बँक मोठी झाली पाहिजे, हे माझे स्वप्न आहे. आपण सर्वांनी रायगड सहकारी बँक मोठी करूया जेणेकरून तीची फळं सर्वसामान्यांना चाखता येतील. बँकेबाबत लोकांमध्ये भविष्यात आणखी ताकदीने विश्वास निर्माण करू. या बँकेचे वटवृक्षात रूपांतर करू, असा विश्वास भाजपा गटनेते, मुंबई जिल्हा बँकेचे आणि रायगड बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी व्यक्त केला. ते रायगड सहकारी बँकेच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

याप्रसंगी मुंबई हौसिंग फेडरेशचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, मुंबई जिल्हा बँकेचे संचालक नितीन बनकर, रायगड सहकारी बँकेचे संचालक मंडळ, सभासद उपस्थित होते.



***आज अभ्यूदय नगरमध्ये खऱ्या अर्थाने दिवाळी होतेय***

*दरेकर म्हणाले कि, अभ्यूदय नगरचे सभासद येथे असतील. त्यांच्याकडे सध्या दिवाळी साजरी होत आहे. कारण ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. माझ्या पाठपुराव्यामुळे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन ६३५ स्क्वे. फुटाच्या घराची बंपर भेट येथील रहिवाशांना दिलीय. अभ्यूदय नगरचा विकास रखडलेला तो आज मार्गी लागलाय. खऱ्या अर्थाने अभ्यूदय नगरमध्ये दिवाळी साजरी झाली.*

यावेळी सभासदांना मार्गदर्शन करताना दरेकर म्हणाले कि, रायगड सहकारी बँकेची आर्थिक स्थिती, अडचणी काय होत्या आणि गेल्या काही वर्षात या सगळ्या अडचणीवर मात करून बँक सुस्थितीत आणली आहे. रिझर्व्ह बँकेचे जे काही निकष आहेत ते पूर्ण करण्याचे काम आपण केले आहे. येणाऱ्या काळात निश्चितपणे चांगल्या प्रकारची भरारी आपण घेणार आहोत. बँकेच्या प्रगतीसाठी जे काही करावे लागेल ते प्रयत्न केले आहेत. आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर या बँकेची वाटचाल कशी करायची याचेही नियोजन केले आहे. सभासदांनीही हातभार लावायला हवा. निश्चितपणे रायगड सहकारी बँकेला वैभवाचे दिवस आणू, असा ठाम विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

दरेकर पुढे म्हणाले कि, आता आपण सगळ्या अडचणीवर मात करत आपली गाडी रुळावर आणली आहे. तिला हळूहळू गती घेत प्रगतीकडे न्यायची आहे. मी स्वतः जास्तीचे लक्ष देऊन लवकरात लवकर आपल्या शाखांना परवानगी कशी मिळेल, आपला कारभार आणखी कशा रीतीने वाढवता येईल यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. तसेच या बँकेचा सर्वसामान्य सभासदांना उपयोग कशा प्रकारे होईल यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न करूया, अशी अपेक्षाही दरेकरांनी व्यक्त केली.

दरेकर पुढे म्हणाले कि, संचालक मंडळ चांगले काम करतेय. परंतु सभासदांचा सहभाग असण्याची गरज आहे. सभासदांचा सहभाग नसेल तर गती घेण्यास अडचण निर्माण होईल. त्यामुळे सर्वांनी बँकेच्या कामात लक्ष घालून सहभाग घ्यावा.

रायगड बँक ही अभ्यूदय नगरमध्ये होती. त्या जागी आता आपण अभ्यूदय नगरच्या सेवेसाठी मुंबई जिल्हा बँक आणतोय. जेणेकरून जिल्हा बँकेचेही सहकार्य येथील सर्वसामान्य माणसासाठी होणार असल्याचेही दरेकर म्हणाले. यावेळी दरेकर यांनी मुंबई जिल्हा बँकेच्या माध्यमातून गिरणी कामगार, माथाडी कामगार, पोलिसांच्या घरांसाठी आर्थिक मदत केल्याचेही सांगितले.

## सामाजिक कार्यकर्ते विष्णू सावंत यांचे निधन



मुंबई :- साकीनाका मोहिली व्हिलेज येथील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते विष्णू सावंत यांचे प्रदीर्घ आजारपणात निधन झाले असून निधन समयी ते ७७ वर्षाचे होते. त्यांच्या निधन पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. साकीनाका सागबाग येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांचा अंतिम संस्कार करण्यात आले

# आज मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित नवीन संकुलाच्या कोनशिलेचे सरन्यायाधीशांच्या हस्ते अनावरण

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन संकुल हे वांद्रे पूर्व, मुंबई येथे बांधण्यात येणार असून आज सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ रोजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ.धनंजय वाय चंद्रचूड यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रस्तावित जागेवर बसविण्यात आलेल्या कोनशिलेचे अनावरण केले जाणार आहे.

या कोनशिला अनावरण सोहळयास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.आर. गवई, न्यायमूर्ती ए.एस.ओक, न्यायमुर्ती दीपंकर दत्ता, न्यायमूर्ती उज्वल भुयान आणि न्यायमूर्ती प्रसन्न बी वराळे व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय उपस्थित राहणार आहेत.

सध्या मुंबईतील फ्लोरा फाऊंटन येथे १६ ऑगस्ट १८६२ रोजी स्थापन झालेली मुंबई उच्च न्यायालयाची इमारत आहे. नोव्हेंबर १८७८ मध्ये बांधण्यात आलेली ही भव्य इमारत केवळ ६ न्यायालये आणि दहा न्यायाधीशांच्या वापरासाठी तयार करण्यात आली होती. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून औद्योगिक आणि आर्थिक विकासात आघाडीवर आहे. काळानुरूप मुंबई उच्च न्यायालयाच्या पायाभूत सुविधांनी युक्त अशा इमारतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. या नवीन प्रस्तावित संकुलात न्यायालयीन खोल्या, न्यायाधीश आणि नोंदणी कर्मचाऱ्यांसाठी चेंबर्स, वकील चेंबर्स, सभागृह, ग्रंथालय याबरोबरच बँकिंग सुविधा, वैद्यकीय सुविधा, कॅफेटेरिया, कार पार्किंग, संग्रहालय अशा विविध सोयी सुविधा उपलब्ध असतील. त्याचबरोबर दिव्यांगांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा या इमारतीत असतील.

# वरळीत तीन आमदार मात्र विकास झिरो!

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची ठाकरे सेनेवर टीका

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

तीन आमदार, एक खासदार, माजी मंत्री, महापौर इतके लोकप्रतिनिधी वरळी मतदार संघात असून देखील त्यांच्या काळात वरळीचा झिरो विकास झाला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र आणि मंत्री इथले आमदार असून देखील वरळीकरांना विकासापासून उपेक्षित ठेवले, आता विधानसभेला जनता त्यांना कायमचे घरी बसवेल, अशी घणाघाती टीका खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली. जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या टप्प्यात वरळी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



काल दक्षिण मुंबई आणि ईशान्य मुंबई मतदार संघातील शिवडी, भायखळा, वरळी, विक्रोळी आणि भांडूप या पाच विधानसभा मतदार संघाच्या बैठका झाल्या. वरळीबाबत सविस्तर बैठक झाली. वरळीकरांचे प्रश्न, कोळीवाड्याचा प्रश्न, बीडीडी चाळ, पोलिस वसाहतींचा पुनर्विकास, एसआरए, सेस इमारतींचे प्रश्न याबाबत मुख्यमंत्र्यांकडे लवकरच बैठक घेऊ, असे ते म्हणाले. कोळी बांधवांचा स्पॅन वाइड करण्याचा प्रश्न आधीच्या सरकारने आणि लोकप्रतिनिधीने होणार नाही, असे सांगितले होते. मात्र सरकार बदलल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने हा प्रश्न मार्गी लावला. कोळी बांधवांना त्याचा फायदा झाला, असे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

वरळीमध्ये विधानसभा निवडणूक लढण्यासाठी शिवसेना सज्ज आहे. पुढचा आमदार धनुष्यबाणावरच निवडून येईल, असा विश्वास असे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीवेळी कल्याण, ठाणे अशा मतदार संघात लढण्याचे खुले आव्हान देणारे त्यावेळी पळून गेले. तोंडाच्या वाफा घालवण्यापेक्षा मैदानात येऊन लढून दाखवा असा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांना लगावला.

धारावीतील मशिदीबाबत राजकारण करणारे तिरुपती मंदिरातील लाडूमध्ये प्राण्यांची चरबी मिसळली, त्यावर बोलताना कसे विसरले, एखाद्या मंदिरावर हातोडा पडत असताना त्यांची तोंडं का उघडत नाहीत, असा खरमरीत सवाल खासदार डॉ. शिंदे यांनी केला.

# गोपाळ शेट्टी यांनी बोरीवलीतून निवडणूक लढवावी

## जय श्री महाकाल ग्रुपतर्फे आवाहन

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी हे आजमितीसही तळागाळातील लोकांची कामे करण्यासाठी तत्पर असतात. त्यामुळे त्यांनी बोरीवली विधानसभा मतदारसंघातून आगामी विधानसभा निवडणूक लढवावी, असे आवाहन जय श्री महाकाल ग्रुपतर्फे नुकतेच करण्यात आले. बोरीवली येथील जय श्री महाकाल ग्रुपतर्फे अनंत चतुर्दशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कर्नल शैलेश शृंगारपुरे आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी पाच दिव्यांग बांधवांना ग्रुपतर्फे प्रत्येकी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली तर १३ उच्चशिक्षित मुलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक ते खासदार पदापर्यंत पोहोचलेले गोपाळ शेट्टी हे सकाळी आठ वाजल्यापासून तळागाळातील जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध असतात. आजही ते बोरीवली परिसराचा विकास करण्यासाठी अहोरात्र झटत असतात. जनतेला अशा लोक प्रतिनिधीची गरज असल्याने गोपाळ शेट्टी यांनी या मतदासंघातून निवडणूक लढवावी, असे आवाहन यावेळी ग्रुपच्या वतीने करण्यात आले. यावेळी सर्व गणेशोत्सव मंडळांना सन्मान चिन्हे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला ग्रुपचे अध्यक्ष विरेंद्र महेता, मुकेश भंडारी, सुरेश शेट्टी, दिवाकर म्हात्रे, कुमार भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

**मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड**
MOTILAL OSWAL HOME LOANS
सीआयएन नंबर : यू६५९२३एमएच२०१३पीएलसी२४८७४१
कॉर्पोरेट कार्यालय: मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५. ई-मेल: hfquery@motilalosawal.com

**खाजगी करार**

प्रती, दिनांक: २३-०९-२०२४

i. मे. करम इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, दुकान क्र. एल २६१, लोवर ग्राउंड फ्लोर, ड्रीम्स-दि मॉल, एलबीएस मार्गाजवळ, भांडूप (पश्चिम), मुंबई ४०००७८.
ii. मे. करम ब्रम्हांड अफोर्डेबल होम्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी करम गार्डन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेले), एल २६१, लोवर ग्राउंड फ्लोर, ड्रीम्स-दि मॉल, एलबीएस मार्गाजवळ, भांडूप (पश्चिम), मुंबई ४०००७८ येथे देखील: २४७ पार्क, हिनकॉन हाऊस, बी विंग, ९ वा मजला, ९०१, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३.
iii. मे. करम इन्फ्रा १ ला मजला, महर अपार्टमेंट, मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा, ठाणे (पश्चिम), ४००६०२
iv. श्री. रमाकांत सुभाष जाधव (हमीदार): ए/ ६ दीपज्योती सीएचएस, सर्व्हिस रोड, नौपाडा, ठाणे पश्चिम ४००६०२
v. श्री. केतन बाबुलाल पटेल बी / २४०२, रुणवाल हाईटस, एलबीएस मार्ग, निर्मल लाइफस्टाइल समोर, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०००८०.

(ह्यानंतर संयुक्तपणे नमूद कर्जदार असा संदर्भ असलेले)

विषय: मोतीलाल ओसवाल होम फायनांस लिमिटेड (पूर्वी अस्पायर होम फायनांस कॉर्पोरेशन लिमिटेड, ह्यानंतर एमओएचएफएल असा संदर्भ असलेले) सुरक्षित धनको ह्यांच्याकडे कोलॅटरल सि क्युरिटी/ गहाणाद्वारे सुरक्षित मत्तेच्या विक्रीसाठी १५ दिवसांची सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत पूर्व विक्री सूचना

प्रिय महोदय/ महोदया,

सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (`सरफेसी कायदा`) च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना दिनांकित २३.०९.२०२३ ची अंमलबजावणी करून देखील तुम्ही उपरोक्त नामित हमीदार रु. ३०८०३०२५५०/- (रुपये तीनशे आठ कोटी तीन लक्ष दोन हजार पाचशे पन्नास मात्र) चा नमूद ६० दिवसांमध्ये भरणा करण्यास असमर्थ ठरले आहेत आणि म्हणून सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी प्लॉटचा धारण केलेला सीटीएस/ सर्वे / अंतिम प्लॉट क्र. गट क्र. ४५२, ४५३, ४६०, ४६१ पी, ४५९ पी, केळवे रोड, पालघर, पालघर ४०१४० च्या सामाईक हमीच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेतला आहे.

आम्ही सुरक्षित मत्तेच्या विक्रीसाठी जाहीर ई-लिलावाचे आयोजन केले होते पण नमूद लिलाव कोणतीही बोली प्राप्त न झाल्याने अयशस्वी झाला. म्हणून आम्ही नमूद सुरक्षित मत्तेची खाजगी कराराद्वारे विक्री करू इच्छित आहोत.

सुरक्षित कर्जदाराशी सल्लामसलत करून, वर नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्ता मालमत्तेच्या विक्रीसाठी राखीव किंमत रु. २५,००,००,०००/- (रु. पंचवीस कोटी) राखीव किंमत निश्चित केली आहे. सुरक्षित कर्जदाराच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे हमीदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) चे पालन करण्यासाठी ही सूचना तुम्हाला पत्त्यांवर दिली जात आहे आणि तुम्हाला याद्वारे सूचित केले जाते आणि सूचित केले जाते की वरील सुरक्षित मालमत्ता या सूचने पासून १५ दिवसांच्या नंतर म्हणजे ११-१०२०२४ रोजी किंवा त्यानंतर दुसऱ्या दिवशी खाजगी कराराद्वारे त्याची विक्री करण्यात येईल.

आपले विश्वासू
(प्राधिकृत अधिकारी)मोतीलाल ओसवाल होम फायनांस लिमिटेड

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

# आमदार दिलीप लांडे यांच्या उपस्थितीत प्रयाग लांडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना आमदार दिलीप लांडे यांचे धाकटे चिरंजीव व युवासेना महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य प्रयाग लांडे यांचा वाढदिवस शनिवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रयाग लांडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कुर्ला काजूपाडा येथील शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात वाढदिवसाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी आमदार दिलीप लांडे यांनी उपस्थित राहून प्रयागला शुभेच्छा देणाऱ्यांचे आभार व्यक्त करत मार्गदर्शन केले. लांडे म्हणाले की चांदिवलीचा विकास करने हाच माझा उद्देश असून गेल्या 20 वर्षात जी कामे झाली नव्हती ती कामे ह्या पाच वर्षात जनतेच्या आशीर्वादाने मी केली आहेत. माझा मुलगा प्रयागचा आज वाढदिवस त्याला आशीर्वाद देण्यासाठी आपण मोठ्या संख्येने आलात मी आपला आभारी आहे.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. ६०/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक ) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस / मुंबई महानगरपालिका / सिडको / रेल्वे / बीपीटी / एमआयडीसी / एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ५० कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २३/०९/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ३०/०९/२०२४ संध्याकाळी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०३/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०४/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप : १.** विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
**टिप : २.** निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/712
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता (प).
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**


वायू विद्युत केंद्र, उरण येथे खालील कामांच्या पुरवठा / कामांसाठी अनुभवी व प्रतिष्ठित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या जात आहेत.

| ई-निविदा | वर्णन | अंदाजित खर्च/ ई.एम.डी. (रु.) | विक्री कालावधी | भरण्याची अंतिम तारीख (१५:०० तासांपर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा ३०००५१३११ | वायू विद्युत केंद्र, उरणमध्ये अग्निशमन करताना 80mm, 100mm, 150mm आणि 200mm व्यासाच्या गंजलेल्या अग्निशमन पाईपलाईनची दुरुस्ती आणि बदलण्याचे काम करणेबाबत. (जेव्हा आवश्यक असेल तेव्हा). | ११.७६ लक्ष १५,२६०/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१४१६ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे 350 KW, 6.6 KV कंडेन्सेट एक्स्ट्रॅक्शन पंप मोटरच्या दुरुस्तीचे काम करणेबाबत. | १०.१८ लक्ष १३,६८०/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१५८२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे HP आणि LP ड्रम इंटर्नल्सची तपासणी आणि सर्व्हिसिंगचे काम करणेबाबत. | १८.५७ लक्ष २२,०७६/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१५८९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विविध सांडपाणी, पिण्यायोग्य पाण्याचे नमुने, घातक कचरा नमुने यांचे विश्लेषण करण्यासाठी वार्षिक कामाचा करार करणेबाबत. | ०.५५ लक्ष १,६७७/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१५९८ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे मेसर्स उराका मेक रेसिप्रोकेटिंग पंपचे पूर्ण अपग्रेड आणि नूतनीकरणाचे काम करणेबाबत. | १४.०० लक्ष १७,५००/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१६४९ | ONGC उरण ते GTPS, उरण पर्यंत 12"X 6.5 किमी 2 नैसर्गिक गॅस पाईप लाईनच्या कॅथोडिक संरक्षण प्रणालीचे निरीक्षण करण्याचे काम पार पाडणेबाबत. | ०४.०१ लक्ष ७,५१७/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१८३९ | वायू विद्युत केंद्र, उरणमधील अग्निशमन विभागतील, अग्निशमन पाइपलाइनसाठी विविध साहित्याचा पुरवठा आणि अग्निशामक यंत्रांच्या देखभालीचे काम करणेबाबत. | ११.९६ लक्ष १५,४६९/- | २३.०९.२०२४ ते १३.१०.२०२४ | १४.१०.२०२४ |
| ई-निविदा ३०००५१८५३ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे जेव्हा आवश्यक असेल तेव्हा युनिट्सच्या सामान्य चालवण्याच्या आणि दुरुस्तीच्या वेळी EOT क्रेन आणि हॉस्टच्या आपत्कालीन दोषांसाठी तज्ञ सेवांच्या तरतूदीसाठी वार्षिक कार्य करार करणेबाबत. | ०६.४७ लक्ष ९,९७६/- | २३.०९.२०२४ ते ०६.१०.२०२४ | ०७.१०.२०२४ |

सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु.११८०/- निविदा खर्च आणि ई.एम.डी. केवळ ऑनलाइन भरणे. आमच्या वेबसाइटवर दिनांक **२३.०९.२०२४** पासून विक्रीसाठी निविदा उपलब्ध आहेत किंवा अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाइटवर भेट द्या https://eprocurement.mahagenco.in संपर्क तपशील: - EE (P&C) - 91-9167007841 विक्रेत्यांना विनंती कि ई-निविदेसाठी फर्म नोंदणी करून घ्यावी. कृपया आमच्या वेबसाइटवर लॉग इन करा https://eprocurement.mahagenco.in

Sd/-
Chief Engineer
GTPS Uran

ऐष आराम हा
जीवनाचा गंज आहे,
प्रतिभेचे मरण आहे,
सर्व शक्तींचा ऱ्हास आहे



- साने गुरुजी

वृत्तमानस

मुंबई, सोमवार, २३ सप्टेंबर २०२४

# एक निवडणुकीचा मार्ग कठीण...

महाराष्ट्रात लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. तर काही महिन्यांपूर्वीच देशात लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. आता सध्या जम्मू काश्मीरमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. तेथे प्रचाराच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत. अशातच केंद्रातील मोदी सरकारने एक देश एक निवडणूक विधेयक मंत्रिमंडळात आणून त्यावर शिक्का मोर्तब करून देशभरात खळबळ उडवून दिली आहे. एक देश, एक निवडणूक' या विधेयकावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधेयक सादर केले जाणार आहे. सरकारकडून विशेषतः नेतृत्व करणाऱ्या भारतीय जनता पार्टीकडून 'एक देश, एक निवडणूक' कसे आवश्यक आहे, त्याचे काय फायदे देशाला होतील हा तर्क मांडला जातो आहे. त्यात सगळ्यात महत्त्वाचे सांगितले जाते आहे ते म्हणजे हा निर्णय झाला तर सातत्याने होणार्या निवडणुकांमधून देशाची सुटका होईल. दुसरा तर्क असा मांडला जातो आहे की सरकारच्या तिजोरीवरील बोजा कमी होईल आणि तिसरा महत्त्वाचा तर्क म्हणजे धोरणात सातत्य राखता येईल. निवडणुका जाहीर झाल्यामुळे योजनांना जो ब्रेक लागतो तो लावण्याची गरज भासणार नाही. व्यवहारी दृष्टिकोनातून यात चुकीचे काहीच नाही. त्यातून झाला तर लाभच होणार. मात्र, काही प्रश्नही उपस्थित होत आहेत, त्याची उत्तरे सरकारला शोधावी लागतील. संख्याबळानुसार जर ते गेले तर त्यांना स्वबळावर हे विधेयक संमत करून घेणे अशक्य आहे. विरोधी पक्षांना सोबत घेतले तरच त्यांना काही करता येऊ शकते. तथापि, विरोधी पक्ष सरकारसोबत येण्याची शक्यता अत्यंत दुर्मिळ आहे. सगळ्यात मोठ्या विरोधी पक्षाचे म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपला इरादा बोलून दाखवला आहे. काँग्रेसचेच एक ज्येष्ठ आणि कायदेतज्ज्ञ असलेले नेते पी. चिदंबरम यांनीही कालच आपला विरोध जाहीर केला आहे. काँग्रेससोबत असणाऱ्या अन्य पक्षांची भूमिका त्याच प्रकारची असणार आहे. त्यामुळे हे विधेयक संमत करून घेणे सरकारपुढे हिमालय उचलून आणण्याएवढे कठीण असणार आहे. 'एक देश, एक निवडणुकी'चा अभ्यास करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. समितीचा अहवाल सादर झाला आहे. आपल्या लोकशाहीला आणखी चैतन्यशील आणि समावेशक बनवण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे समितीला आणि सरकारलाही वाटते पंतप्रधानांनीही सोशल मीडियावर तशीच प्रतिक्रिया दिली आहे. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात 100 दिवसांच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जाव्यात, असे समितीने सुचवले आहे. एकाचवेळी निवडणुका घेण्यासाठी संविधानात दुरुस्ती करण्याची शिफारस कोविंद समितीने केली आहे. प्रामुख्याने दोन घटनादुरुस्ती कराव्या लागणार आहेत आणि तेथेच सगळे अडणार आहे. त्याचे कारण म्हणजे कोणतेही घटना दुरुस्ती विधेयक संमत करून घेण्यासाठी दोन तृतीयांश मतांनी ते विधेयक संमत होणे गरजेचे असते. किंवा असेही म्हणता येते की सभागृहात उपस्थित असलेल्या एकूण सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले पाहिजे. लोकसभेतील एकूण सदस्य संख्या 543 आहे. विधेयकाच्या बाजूने 362 मते पडणे आवश्यक आहे. आजच्या घडीला भारतीय जनता पार्टीची स्वतःची सदस्यसंख्या 240 आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांची संख्या धरून हा आकडा 293 पर्यंतच जातो. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीकडे 234 संख्याबळ आहे. याचा अर्थ विधेयक संमत करून घेण्यासाठी सरकारला विरोधी पक्षांच्या मदतीची गरज भासणारच आहे. तुलनेने राज्यसभेत सरकारची स्थिती चांगली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे 113 आणि नियुक्त केलेले 6 असे संख्याबळ त्यांच्याकडे आहे, तर विरोधकांचे संख्याबळ 85 आहे. मात्र या सभागृहातही विधेयक संमत करायचे झाल्यास 164 सदस्यांचा पाठिंबा असणे क्रमप्राप्त आहे. दोन्ही सभागृहातून किमान शंभर सदस्य अनुपस्थित अथवा तटस्थ राहिले तर दोन तृतीयांश बहुमताने विधेयक संमत करवून घेता येईल. मात्र, मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात ही बाब सर्वथा अशक्य वाटते. कोविंद समितीने 62 राजकीय पक्षांकडून मत मागवले होते. एकूण 47 राजकीय पक्षांनी आपले मत मांडले. यापैकी 32 जणांनी 'एक देश, एक निवडणूक'ला पाठिंबा दिला तर 15 पक्षांनी विरोध केला. यावर्षी मे-जून महिन्यात लोकसभा निवडणूक झाली होती. त्याचवेळी ओडिशा, आंध्र, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशात निवडणूक झाली. जम्मू-काश्मीर आणि हरियाणात आता निवडणूक सुरू आहे व वर्षाअखेरीस महाराष्ट्र, झारखंड आणि झालेच तर दिल्लीचीही निवडणूक होईल. पुन्हा पुढच्या वर्षी बिहारमध्ये निवडणूक आहे व त्यानंतर 2026 व 2027 मध्ये किमान अर्धा डझन राज्यांत निवडणूक घ्यावी लागेल. विद्यमान लोकसभेचा कार्यकाळ जर सरकार पूर्णवेळ टिकले तर 2029 मध्ये संपणार. इतक्या राज्यांची त्या वर्षाशी सांगड घालावी लागेल. त्यासाठी पुन्हा आवश्यक सहमती घडवून आणावी लागेल. अर्थात सहमती घडवून आणण्यासाठीची दारे कधीच बंद नसतात आणि लोकशाहीची पहिली अटच सहमतीचे राजकारण आहे. त्यामुळे सरकार एखाद्या संसदीय स्थायी समितीकडे अथवा संयुक्त संसदीय समितीकडे हे विधेयक पाठवून सगळ्यांना सोबत घेण्याचा प्रयत्न करू शकते आणि त्यांना तसे करावेही लागेल. या समितींमध्ये सर्व पक्षांचे सदस्य असल्यामुळे राजकीय पक्षांशी संवाद साधणे सरकारला सोपे होते आणि काही बाबी स्वीकारून आणि काही बाबी वगळून विधेयकाच्या संमतीचा मार्ग प्रशस्त करता येतो. यासाठी संवाद साधणे आणि त्यात सातत्य असणे किमान अट आहे जी सध्या दूरदूरपर्यंत दिसत नाही. काँग्रेसने आपला चेंडू टाकला आहे. तेलगू देसम या सरकारमधील घटक पक्षाचीही बिनशर्त नाही तर तत्त्वतः संमती आहे. अशा वातावरणात दोन्ही सभागृहांत घटना दुरुस्तीसाठी सरकार पाठिंब्याचा आकडा आणणार कुठून, हा प्रश्नच आहे व लोकसभा आणणार कुठून, हा प्रश्नच आह व लाकसभा आणि विधानसभा दोन्हींचा कार्यकाळ सोबत आणण्यासाठी आपल्या टर्ममधील काही काळाचा त्याग करणार कोण, हे मोठे प्रश्न आहेत. हे विधेयक जरी समोर आले असले तरी त्याला काँग्रेसकडून प्रकार विरोध होत आहे. काँग्रेस सोबतच इतर लहान प्रादेशिक पक्ष देखील याच्या विरोधात आहेत. ही पद्धती देशात लागू केली तर त्याचा मोठा फटका प्रादेशिक पक्षांना बसणार आहे. त्यांचे निवडणूक लढवाण्याचे अस्तित्व संपणार आहे. देशाच्या राज्य घटनेनने त्यांनाही निवडणूक लढवण्याचा अधिकार दिला आहे. अपक्ष उभे राहूनही त्यांना निवडणूक लढता येते. पण या पद्धतीने त्यांच्या अधिकारावर गडा येणार असल्याची भीती वाटते आहे. या भीतीला आणखी हवा देऊन काँग्रेस त्यांची मोट बांधण्याचा नक्की प्रयत्न करणार आहे. कारण देशात सगळ्यात जास्त सत्तेवर राहूनही काँग्रेस पक्षाने कधी असा अजेंडा पुढे आणला नाही. अशी एकेरी निवडणूक पद्धती देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जाईल अशी भीती काँग्रेस आणि इतर काही प्रादेशिक पक्षांना वाटते. असे करून भाजपाला या देशातील लोकशाही संपवायची आहे असा या पक्षांना वाटते. त्यामुळेच ते या पद्धतीच्या विरोधात उभे राहतील हे नक्की. अर्थात त्यांना काँग्रेस पक्षाकडून बळ पुरवले जाऊ शकते. म्हणूनच मोदी यांनी जरी हे विधेयक आणले असले तरी त्याच्या वाटेत अनेक अडचणी येणार आहेत.

# पालिकेच्या कामावर विधानसभा निवडणूक

**राज्याचे** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणूक होईल असे जाहीर केल्यापासून सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने हे जाहीर करायला हवे होते ते मुख्यमंत्री जाहीर करतात. याचा अर्थ राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांचा समन्वय चांगला आहे. एकमेकांचा विचार घेऊन कामकाज ते करीत आहेत. यावर विश्वास ठेऊनच भलेही मुख्यमंत्र्यांनी जरी निवडणुकीचे सूतोवाच केले तरी ते खरे आहे. असे समजून सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. पण यात निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेला तडा गेला आहे. ही बाब लोकशाही न्याय व्यवस्थेला साजेशी आहे असे म्हणता येणार नाही. कारण इतके दिवस म्हणा की, वर्षे म्हणा, निवडणूक आयोग हा स्वायत्त आहे. सत्ताधारी राजकीय पक्ष त्यांच्या कामात ढवळाढवळ करू शकत नाही. असा लोकांचा समज होता. तो देशात गेल्या काही वर्षात गळून पडला आहे. त्यावर आता मुख्यमंत्र्यांच्या सूतोवाचानंतर शिक्कामोर्तब झाले आहे. अन्यथा हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणूकीची घोषणा १६ ऑगस्ट २०२४ रोजी करतानाच निवडणूक आयोगाने विधान सभेची मुदत संपत असलेल्या महाराष्ट्र व झारखंड विधानसभा निवडणुकीची ही घोषणा केली असती. पण तसे झाले नाही. दुसरी गोष्ट अशी की, मुख्यमंत्र्यांनी नोव्हेंबर मध्ये विधानसभा निवडणुकीचे सूतोवाच करताच केंद्रीय निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी याच महिना अखेर महाराष्ट्रात येणार आहेत. हा योगायोग नक्कीच म्हणता येणार नाही. पण मुख्यमंत्र्यांच्या सुतोवाचानंतर राज्यातील राजकारणात खूप मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात महायुती, महाविकास आघाडी या दोन आघाड्यानंतर तिसरी आघाडी जन्माला आली आहे. तसेच मनसे ,वंचित, जारांगे पाटील हे ही आपले उमेदवार उभे करणार आहेत.त्यामुळे निवडणुकी मध्ये रंगत येणार आहे. मात्र तिसरी आघाडी, मनसे, वंचित आणि जरांगे हे सारेच महायुती विरोधात लढणार असले तरी मतफुटीमुळे महायुतीचाच फायदा होणार आहे. त्यामुळे आमचाच मुख्यमंत्री होईल असे सांगणाऱ्या महाविकास आघाडीतील पक्षांना हा जोराचा झटका असेल हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. व रणनीती आखली पाहिजे. तरच लोकसभा निवडणुकीनंतर हवेत असलेल्या महाविकास आघाडीतील पक्षांना विधानसभा निवडणुकीत ही चांगले यश संपादन करता येऊ शकेल. पण विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी महायुतीचे नेते किमान मुंबईत तरी मुंबई महानगरपालिकेच्या कामांचा आधार आणि पैशाचा वापर करताना दिसत आहेत. व मुंबईकरांच्या हिताची कामे आम्हीच करीत आहोत असे भासविण्याचा प्रयत्न करीत आहेत.मुंबईचे सुशोभिकरण, सिमेंट काँक्रीटचे रोड, मेट्रोसाठी वर्गणी, वांद्र्याच्या पुढचा कोस्टल रोड बनविण्यासाठी, मुंबईतील दरडप्रवण विभागात संरक्षण भिंती बांधणे व लोकांचे स्थलांतर करणे, मुंबईतील सर्व स्कायवॉक ही पालिकेकडे सोपविण्यात आले आहेत. त्याची डागडुजी पालिकेला बघावी लागते., मिठी नदीच्या चा काही भाग एम एम आर डी ए होता तोही पालिकेकडे देण्यात आला आहे. खरे तर यातील ९० टक्के कामे एम एम आर डी ए , जिल्हाधिकारी यांची आहेत पण ती मुंबई महानगरपालिकेच्या माथी मारण्यात आली आहेत. त्याच बरोबर शहर भागाचे पालक मंत्री दीपक केसरकर यांनी पालिका वार्ताहर कक्षात येऊन पालिकेच्याच कामांची घोषणा करून आचारसंहिता लागू होण्यापूर्वी आम्ही उद्घाटने, भूमिपूजने करू असे पत्रकारांना सांगितले. या कामात मुंबईतील प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करणार. मुंबईतील सर्वधर्मीय स्थळांच्या ठिकाणी हायमास्ट दिवे लावणार व सुशोभिकरण करणार. उद्यानांच्या खालील भागात, मोकळ्या जागेत भूमिगत मार्केट बनविणार. फॅशन स्ट्रीटवरील अतिक्रमण रोखून आहे त्या लोकांना एकसमान स्टॉल उपलब्ध करून देणार. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये सीसी कॅमेरे लावणार. वरळी येथे नागरिकांना वैद्यकीय सुविधा देण्यासाठी कोळीवाड्यातील पालिका इमारतीत रुग्णालय, अतिदक्षता विभाग सुरू करणार. प्रभादेवी ते माहिमपर्यंत च्या चौपाटीवर जीओ ट्यूबच्या माध्यमातून पूर्वीप्रमाणे मोकळी जागा उपलब्ध करून देणार. महालक्ष्मी रेसकोर्स येथे ३०० एकर जागेत थीम पार्क बनविण्यात येणार आहे, असे मंत्री केसरकर यांनी सांगितले. त्याचप्रमाणे, हाजीअली सब वे एसी बनविणार आणि हायटेक टॉयलेट बनविण्यात येणार आहे. त्यामध्ये, बसण्यासाठी चांगली आसन व्यवस्था असेल. कॉफी , नाश्ता सुविधा असणार आहे. गेट वे प्लाझा बनविण्यात येणार आहे. तसेच, महाराष्ट्र दालनाचे



**महापालिकायन**

सुनील शिंदे

मोबाईल नंबर-९८२१९९६११७

सुशोभिकरण करण्यात येईल. मुंबईच्या विकासात मोठे योगदान देणारे जगन्नाथ शंकर शेठ यांचे स्मारक उभारण्यात येणार असून या कामाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत येत्या १५ दिवसात भूमिपूजन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या गरीब मुलांच्या घरात अभ्यास करण्यासाठी जागेची कमतरता असते. त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यासाठी शांत वातावरण असावे, त्यांना पुस्तके वाचण्यासाठी व अभ्यास करता यावे यासाठी एका महिन्यात कंटेनरमध्ये एसी ग्रंथालय उभारण्यात येणार आहे.

भागोजी किर यांचे शिवाजी पार्क येथे स्मारकही उभारण्यात येणार आहे. क्रॉफर्ड मार्केट परिसरात वजनदार सामानाची ने - आण करण्यासाठी वापरात असलेल्या ३,७०० हातगाड्या टप्प्याटप्प्याने बंद करून त्याऐवजी बॅटरी ऑपरेट कार उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्यामुळे हातगाड्यांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येमधून सुटका होईल आणि हातगाडी ओढण्याचे श्रम वाचतील तसेच वरळीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना ये - जा करण्यासाठी छोट्या चारचाकी गाड्या उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच, रुग्णांसाठी बॅटरी ऑपरेट रुग्णवाहिका सुद्धा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. या साऱ्या योजना पालिका खर्चातून होत आहे किंवा त्या होऊ घातल्या आहेत.पण त्याचे श्रेय सरकार घेऊ पाहतेय हे मुंबईकरांनी समजावून घेण्याची गरज आहे. पालिकेकडे खूप पैसा आहे. असा समज राज्य सरकारने करून घेतला आहे. त्यामुळे ते आपल्या अखत्यारितील कामेही पालिकेच्या पैशातून करून घेत आहेत. हा मुंबईला कंगाल करण्याचा , कर्जबाजारी करून निवडणुकीत आपले मनसुबे पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मग त्यानतर भलेही मुंबई महानगरपालिकेत विरोधकांची सत्ता आली तरी.त्याने काहीही फरक पडणार नाही.हा विचार महायुतीतील नेत्यांनी केलेला दिसतो आहे.पण पालिकेत कुणाची ही पुढे सत्ता आली तरी रीती केलेली तिजोरी भरण्यासाठी शेवटी पालिका मुंबईकरांच्याच खिशात हात घालणार आहे. हे सुध्दा मुंबईकरांनी लक्षात घेतले पाहिजे.

**दिवाळी बोनस**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान दिवाळी हा सण येतो आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिवाळी आहे. व त्यानंतरच १०-१२ दिवसानंतर मतदान होण्याची शक्यता आहे. पण या निवडणुकीची आचारसंहिता याच सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस लागण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेतील कामगार कर्मचाऱ्यांना दरवर्षी सानुग्रह अनुदान देण्याची प्रथा आहे. पालिकेचे एक अंग असलेल्या बेस्ट कामगारांना ही पालिका कर्मचाऱ्यांना मिळतो तेव्हढेच सानुग्रह अनुदान देण्याची प्रथा पडलेली आहे. इतकेच नव्हे तर बेस्ट कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या या रकमेची पूर्तता ही पालिका प्रशासनालाच करावी लागत आहे. त्यामुळे पालिकेला हा मोठा खर्च आहेच.पुन्हा नव्या वर्षात होणाऱ्या पालिका निवडणुकीसाठी ही खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे सन २०२५ -२६ च्या पालिका अर्थसंकल्पात मुंबईकरांना करवाढीचा बोजा सहन करावा लागेल असे एकूण चित्र आज तरी दिसत आहे. गेल्या वर्षी ८ नोव्हेंबर २०२३ रोजी वर्षा बंगला येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुंबई महानगरपालिका, बेस्ट उपक्रम, खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, आरोग्य सेविका यांना( आरोग्य सेविका सोडून) सरसकट २६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली होती. या वर्षी निवडणूक असल्यामुळे कामगार कर्मचाऱ्यांना गेल्या वर्षी पेक्षा अधिक सानुग्रह अनुदान जाहीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर्षी विविध कामगार संघटनांच्या समन्वय समितीने वित्तीय लक्षाच्या किमान २० टक्के इतका बोनस वा सानुग्रह अनुदान देण्याची मागणी आयुक्तांकडे निवेदन देऊन केली आहे. शशांक राव यांच्या दि म्युनिसिपल युनियनने ही २० टक्के आणि म्युनिसिपल मजदुर संघाने सर्वांना सरसकट २० टक्के अधिक रुपये ४० हजार बोनस, सानुग्रह अनुदान देण्याची मागणी केली आहे. विधानसभा निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी रक्कम जाहीर करावी अशी मागणी सर्वच कामगार संघटनांनी केली आहे. शेवटी यासाठी लागणारा पैसा पालिकेचाच खर्च होणार आहे. त्यामुळे अधिक सानुग्रह अनुदान घोषित करायला काय हरकत आहे हा विचार या वर्षीही मनात येऊ शकतो. पण पालिकेकडे जो पैसा येतो तो मुंबईकरांनी भरलेल्या विविध करातून. तो पैसा मुंबई करांच्याच विकास कामासाठी, सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, शिक्षण, आरोग्य, पाणी, केरकचरा काढणे, चांगले रस्ते, या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी असतो नव्हे ते पालिकेचे बंधनकारक कर्तव्यच आहे. पण गेल्या काही वर्षापासून पालिकेचा खर्च आणि मिळकत यांचा मेळ बसत नसल्याने पालिकेला अंतर्गत निधीतून कर्ज काढावे लागत आहे. या अतंर्गत निधीत कर्मचाऱ्यांचा भविष्य निधीचा पैसा, कंत्राटदारांकडून घेतलेली अनामत रक्कम( ती पुन्हा परत करायची असते), पालिकेच्या मोठ्या कामांची खर्चाची रक्कम, सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन ची रक्कम अशा या रक्कमा आहेत. पण गेल्या २-३ वर्षापासून पालिकेने सरकारच्या सांगण्यावरून कोट्यवधी रुपयांची रक्कम तेथून काढली आहे .एम एम आर डी ए ला तर मेट्रो साठी ची वर्गणी देण्यासाठी पालिका प्रशासनाने त्यातल्या एफ डी तोडल्या आहेत. विशेष म्हणजे पालिकेत लोकनियुक्त लोकप्रतिनिधी नसताना ही सरकार पुरस्कृत लूट चालू आहे. ती थांबवण्याची गरज आहे.

**धारावीतील पुनर्विकासात पालिकेचा सहभाग?**

आशिया खंडात सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास राज्य सरकारच्या पाठिंब्याने स्थानिक लोकांचा विरोध मोडून आदानींच्या मार्फत सर्व साम दाम दंड भेद अनुसरून करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आता तर धारावीच्या पुनर्विकासात पालिकेलाही ओढण्याचा प्रयत्न होतो आहे. असे दिसते. शनिवारी धारावीतील ९० फूट रोडवरील "मेंहेबुब ए सुबहानी" या मशिदीचे अनधिकृत बांधकाम तोडायला पालिका जी उत्तर विभाग कार्यालयातील पथक तिथे गेले होते.पालिकेने मशिदीच्या विश्वस्तांना नोटीस बजावली होती.पण दिलेल्या कालावधीत विश्वस्तांनी अनधिकृत बांधकाम न हटविल्यामुळे पालिकेचे पथक शनिवारी ते तोडायला धारावीत दाखल झाले होते. पण जमावांमुळे तिथला तणाव वाढल्यामुळे व विश्वस्तांनी तीन चार दिवसांची मुदत मागितल्याने व ती पालिका अधिकाऱ्यांनी मान्य केल्यामुळे पालिका टीम परत आली. पण त्या दिवशी पालिकेने काढलेल्या प्रेस नोट मध्ये मात्र तिथले वातावरण कसे तापले होते. याची माहिती न देता केवळ विश्वस्तांनी मागितलेली ४-५ दिवसाची मुदत मान्य करण्यात आल्याचे त्यात म्हटले आहे. यावरून धारावीच्या पुनर्विकासात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पालिकेलाही ओढले असल्याचे दिसत आहे. त्यामुळे आता पलिकेलही धारावी पुनर्वसन कामात सक्रिय सहभाग नोंदवावा लागणार आहे. धारावीकरांना त्यांचे हक्काचे घर मिळावे म्हणून सरकार अदानी यांना मदत करत आहे. पण सरकारला शहर भागातली ही सर्वात मोठी झोपडपट्टी हटवून धारावीकरांना अन्यत्र हलविण्याच्या डाव आहे. त्यामुळेच अदानी कुठल्याही विरोधाला न जुमानता धारावीत काम सुरू करीत आहेत.हा मुंबईतील सर्वच झोपडीवांसियांना इशारा आहे. दुसरे काय?

## पत्र मानस

### उत्सवात उन्माद नको !

सध्या सणा - वाराचे आणि आनंदाचे दिवस आहेत.सण हिंदूंचे असोत किंवा अन्य धर्मियांचे असोत . उत्सव साजरे करताना त्याचे उत्सवी स्वरूप आनंददायी नक्कीच असते. अर्थातच उत्सवातून आनंद , उत्साह मिळत असतो, तसा तो मिळायला हवा.याबद्दल शंका नाही.मात्र, हा उत्साह बेधुंद झाला की या लोकांना आंनद मिळण्याऐवजी त्रास होत असेल तर त्याला उत्साहाचा उत्साह कसे म्हणता येईल? अलीकडच्या काळात सर्वच उत्सवांना उन्मादी स्वरूप प्राप्त झाले आहे. दरवर्षी गणेशोत्सव, नवरात्रौत्सवाचा काळात उत्सव व विसर्जन मिरवणुकीत मोठया प्रमाणात डीजेचा आवाज ,प्रखर विद्युत रोषणाई आणि फटाक्यांची आतषबाजी केली जाते.वाद्य संगीताच्या व डीजेच्या चालीवर विद्युत रोषणाईसह लेझर प्रकाशझोत वापरण्याची नवी टूम निघाली आहे. नुकतीच गणेश विसर्जन मिरवणुकीत परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरात डीजेच्या आवाजाने एका तरुणाचा मृत्यू झाला आणि तिघेजण अस्वस्थ झाले.तर मध्यंतरी लेझर किरणांमुळे काही जणांच्या डोळयांना गंभीर इजा झाल्याची बाब उघड झाली .सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ध्वनिप्रदूषणाची पातळी कोणीच पाळत नाही. पोलिसांनाच ध्वनीप्रदूषणाचा त्रास होत राहतो .४०-४५ डेसिबलच्या पुढे आवाज गेल्यानंतर व्यक्ती त्या सहन करू शकत नाहीत. रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत फटाके फोडू नयेत, असा नियम सर्वोच्च न्यायालयाने घालून दिला आहे. डीजेवर बंदी घालण्याच्या सूचना आहेत. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आदी ठिकाणी शांतता राखली जावी,असे आदेश आहेत:परंतु हे आदेश कोणीही पाळत नाहीत. ध्वनिप्रदूषणाचे निकष ठरविताना सर्वोच्च न्यायालयाने तज्ज्ञांचे मत विचारात घेतले होते. पोलीस प्रशासन सुध्दा याकडे दुर्लक्ष करत असते.मुंबई महापालिकेने काही वर्षांपूर्वी शाळा, महाविद्यालये, धार्मिक स्थळे, रुग्णालये आणि न्यायालये आदीं पासून शंभर मीटरच्या परिसरात 'सायलेन्स झोन' निर्माण केले,मात्र तरीही प्रत्यक्षात तेथेही नियम पाळले जात नाहीत. शांतता क्षेत्रे फक्त कागदावरच आहेत. ध्वनिप्रदूषणाबाबत परदेशात कडक नियम आहेत, तिथे नियम तोडला की दंड आणि दंड भरला नाही, तर सरळ तुरुंगात रवानगी होते. पोलिसांच्या कामात कोणीही हस्तक्षेप करत नाहीत.आपल्याकडे पोलिसांनी कारवाई करण्यापूर्वीच राजकीय नेत्याचा फोन पोलिसांना आलेला असतो. तेव्हा ध्वनिप्रदूषणाची बाधा होणाऱ्यांचे आक्रंदन सरकारच्या कानांपर्यत पोचेल किंवा नाही, याविषयी शंका आहे. उत्सवात जोश आणि जल्लोष जरूर असावा; पण त्यासाठी सामाजिक स्वास्थ्याच्या मर्यादा ओलांडण्याची गरज नसते. नाद - निनाद वेगळा आणि कर्कशपणा वेगळा .पण हे तारतम्य एकूणच हरवत चालले आहे.लग्नसमारंभां पासून ते सार्वजनिक उत्सवांपर्यत सगळीकडे डीजे आणि लेसर प्रकाशझोताचा अक्षरशः सुळसुळाट झालेला आहे आणि सर्वसामान्य लोकांची ही डोकेदुखी कोणाला दिसत नाही.तेव्हा सुजाण, शांतताप्रेमी नागरिकांनी एकत्र येऊन आवाज उठविण्याची वेळ आली आहे.जनमताचा रेटाच ध्वनिप्रदूषणाचा गैरवापर थांबून शकेल.

**- सुनील कुवरे, शिवडी**

### एकत्रित निवडणुकांचे आव्हान

सध्या देशात 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेची जोरदार चर्चा सुरू आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी देशातील निवडणुका एकत्रित घेण्याबाबत दिलेला सविस्तर अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वीकारल्याने देशात आता भावी परिवर्तनाला सुरुवात झाल्याचे दिसते. त्यातच विरोधी पक्षांनी यावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. देशात विविध राज्यांमध्ये नेहमीच निवडणुका होत असल्याने पैसा, वेळ व यंत्रणेचा मोठा अपव्यय होतो. या निवडणुकांचा सरकार व नोकरशाहीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याने, त्यावर उपाय म्हणून देशभरात एकत्रित निवडणुका घेण्याचा विचार पुढे आला. अर्थात तो कितपत व्यवहार्य व घटनात्मक चौकटीत बसणारा आहे हे मात्र पहावे लागेल. या अनुषंगाने समितीने दिलेली कारणे उथळ असल्याचे दिसते. निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा असल्याने खर्च हा अनिवार्य आहे. तर विकास कामांना आचारसंहितेचा फटका बसतो हेही म्हणणे ग्राह्य वाटत नाही कारण अपवादात्मक प्रसंगी निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन विकास कामे मार्गी लावता येतात. ज्यांना चार राज्यांच्या एकत्रित निवडणुका घेता आल्या नाहीत, तसेच महाराष्ट्रातील लोकसभेच्या निवडणुका सात टप्प्यात घ्याव्या लागल्या, ते २९ राज्यांच्या एकत्रित निवडणुका कशा काय घेऊ शकतील ? अर्थात त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, सुरक्षा बळ व आवश्यक यंत्रसामुग्री यांचा निवडणूक आयोगाने विचार करायला हवा. याला काही माजी निवडणूक आयुक्तांनीही विरोध केला आहे. मुळात सत्ताधारी पक्षापुढे सहमतीचे मोठे आव्हान असून संसदेत व राज्यसभेत दोन तृतीयांश बहुमत नसल्याने हे धोरण प्रत्यक्षात येणे अशक्य वाटते. त्यासाठीची घटना दुरुस्ती करणे सोपे नाही. त्यासाठी सर्व पक्षांची सहमती असणे आवश्यक आहे. विद्यमान सरकारमधील घटक पक्ष भविष्यात कोणती भूमिका घेतील याचीही खात्री देता येत नाही. ही समिती केवळ भाजपच्या लोकांची असल्याने एकतर्फी ठरते. यातील अनेक गोष्टींचा अद्याप नीट उलगडा करण्यात आलेला नाही. ह्या अहवालाप्रमाणे निवडणुका या ठरलेल्या वेळीच घ्यायच्या म्हणजे पुन्हा पाच वर्षे निवडणुका नसणार. त्यामुळे काळजीवाहू सरकारलाच आणखी पाच वर्षे मुदत वाढ मिळणार. राज्यांमध्ये जर एकाच पक्षाला बहुमत मिळाले नाही व सरकार स्थापन होऊ शकत नसल्यास राष्ट्रपती राजवट अटळ असणार. तीच अवस्था केंद्रातही होऊ शकते. यामुळे केंद्राच्या हातात राज्यांची सूत्रे जाण्याची शक्यता दिसून येते. तसेच पक्ष फोडीचा घोडेबाजार तेजीत येण्याची दाट शक्यता असून विरोधकांना सत्ता मिळणार नाही. त्यातून एखादे सरकार पडल्यास मध्यावधी निवडणुकीनंतर उर्वरित काळासाठीच हे सरकार असणार ! तसेच सत्ताधाऱ्यांना जर पैशाचा अपव्य टाळायचा असेल तर त्यांनी प्रथम पक्ष फोडून सरकारे पाडण्याचे धंदे बंद करावेत.तसेच जाहिरातबाजी कमी केल्यास पैशाची बचत होईल. देशात संसदीय लोकशाही प्रणाली असल्याने अध्यक्ष राजवट येथे केवळ अशक्यच आहे. ज्यांना एक देश, एक कर प्रणाली यशस्वी राबवता आली नाही, त्यांना एक देश, एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे तसे आव्हानात्मकच आहे.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

## अखिल भारतीय व्यास संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात संतांची हजेरी

**वाराणसी:** अखिल भारतीय व्यास संघाचे पाचवे अधिवेशन वाराणसीतील नरहरीपुरा येथील सिद्धपीठ पाताळपुरी मठ येथे 22 सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला असून यामध्ये मोठ्या संख्येने संत सहभागी झाले होते. या अधिवेशनात अरविंद आचार्य यांनी मध्य प्रदेशचे प्रतिनिधित्व केले. संतांच्या माध्यमातून या संमेलनात बांगलादेशी हिंदूंच्या सुरक्षेबाबत चिंतन, हिंदू देवी-देवतांवर केलेल्या अशोभनीय वक्तव्याचा निषेध प्रस्ताव, वक्फ बोर्डाच्या असंवैधानिक अधिकारांवर चिंतन, व्यास संघाच्या अखिल भारतीय रचनेचे चिंतन, धर्मांतर बंदी आणि धार्मिक जागृतीचे चिंतन, दलित वस्त्यांमध्ये 'श्री राम चरित कथा' आयोजित करून शहर आणि गावात मंदिरांच्या संवर्धनासाठी चर्चा करण्यात आली.



म ह त्वा चे

### जासई विद्यालयात कर्मवीर जयंती उत्साहात साजरी

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई, ता. उरण जि.रायगड. या विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी, पद्मभूषण, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती मोठ्या उत्साहात २२ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात आली. विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या शुभहस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन केले. फुलांनी सजवीलेल्या कर्मवीरांच्या पालखी मिरवणुकी सोबत विद्यालयाचे लेझीम पथक, ढोल ताशा, बँड पथक आणि सर्व विद्यार्थी कर्मवीरांच्या जयघोषाने संपूर्ण जासई गावातून पालखी मिरवणूक फिरविण्यात आली. यावेळी गावातील माता पालक,ग्रामस्थ आणि सुवासिनिंनी कर्मवीरांच्या पालखीचे पूजन करून आशीर्वाद घेतले. आकर्षक पोशाख आणि फेटे परिधान केलेल्या लेझीम पथकाने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले होते. संपूर्ण जासई गाव कर्मवीरांच्या जयघोषाने दुमदमून गेले होते.

### एकाच दिवशी घरफोडीच्या पाच घटनांची नोंद

**नवी मुंबई:** नवी मुंबईत एकाच दिवशी पाच घरफोडीची नोंद करण्यात आली असून यात दोन दुकाने तर अन्य घरे आहेत. यात एकूण १० लाख ३८ हजार ४१० रुपयांचा ऐवज चोरी झाला आहे. शिरवणे एमआयडीसी येथे असणाऱ्या टाटा आणि मारुती या कंपन्यांच्या वाहनांच्या दुकानांतून अज्ञात चोराने ३ लाख १६ हजार ९१० रुपयांची रोकड चोरी केली आहे. ही चोरी १७ सप्टेंबर रोजी अपरात्री करण्यात आली आहे. चोरट्यांनी दुकानांचे दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला होता. विशेष म्हणजे एकाच रात्री ही चोरी करण्यात आल्याने चोर एकच असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही दुकानांची मिळून एकच तक्रार घेत अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा लागू करण्यात आला आहे.

### नेरुळ विभागात अनधिकृत झोपड्यांवर कारवाई

**नवी मुंबई:** अनधिकृत झोपड्यांविरुद्ध नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत नेरुळ विभागात कारवाई केली. नेरूळ पूर्व येथील भगवान बाबा गार्डन, सेक्टर ९, नेरुळ ग्रीनलॅन्ड अपार्टमेंटजवळ नवी मुंबई महापालिका जल उदंचन केंद्रासमोर भर रस्त्यात पदपथावर अनधिकृत झोपड्या वसवण्यात आल्या होत्या. त्या झोपडपट्ट्यांमधून अवैध व्यवसाय सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. या ठिकाणी रात्री २० ते २५ लोक पदपथावरच झोपत असल्यामुळे सर्वसामान्य महिलांना वाट काढणे कठीण झाले होते.

# अजित पवारांचा दौरा रद्द करणारा अजून जन्माला यायचाय

## पक्षातील नेत्यावरच अजितदादा संतापले

प्रतिनिधी
■ सोलापूर

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अनेक नेते महाराष्ट्राचा दौरा देखील करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यभर सध्या जनसन्मान यात्रा काढली आहे. सध्या त्यांचा सोलापूर जिल्ह्याचा दौरा सुरू आहे. मात्र मोहोळ येथे अजित पवारांच्या दौऱ्यापूर्वीच अजित पवार गटातील नेते उमेश पाटील यांनी मोहोळ बंदची हाक दिली. यावर अजित पवारांनी त्यांना चांगलेच सुनावले आहे.



पक्षातील माजी आमदार राजन पाटील यांच्याशी असलेल्या वादामुळे उमेश पाटील यांनी थेट अजित पवारांनाच आव्हान देण्याचा प्रयत्न केला. यावर अजित पवार म्हणाले, कुत्रे गाडी खाली जाते, तसे त्याला वाटते तोच गाडी चालवतोय. कोणीतरी पठ्ठ्या म्हणाला, दादाचा दौरा मी रद्द केला. परंतु अजित पवारांचा दौरा रद्द करणारा अजून जन्माला यायचा आहे, असे म्हणत त्यांनी उमेश पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. पुढे ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी अचानक दौऱ्यावर आले म्हणून मी मोहोळचा दौरा रद्द केला होता, असे अजित पवारांनी स्पष्ट केले.

अजित पवार पुढे म्हणाले, मोहोळकरांना आगामी काळात देखील निधीची कमतरता भासू देणार नाही, असा शब्द देतो. मोहोळ आणि बारामती फार दूर नाही. मी शब्दाचा पक्का आहे. मिळालेल्या पदाचा आणि संधीचा वापर या भागातील लोकांसाठी विकास कसा करता येईल, त्यासाठी करावे. काही जण टीका करतात मी त्याकडे लक्ष देत नाही. मात्र आपण लोकांना फसवायचे नाही, लुबाडणूक करायची नाही, असे अजित पवारांनी सांगितले आहे.

नीतेश राणे यांच्या विधानवार अजित पवार म्हणाले, आजसुद्धा मी शिवसेना आणि भाजपसोबत आहे. पण असे असले तरी देखील मी सेक्युलर विचारधारा सोडलेली नाही, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांसोबत आहे. महाराष्ट्रात काही लोक मुद्दाम जातोय द्वेष पसरवत असल्याचे देखील यावेळी अजित पवारांनी म्हटले आहे.

# माझ्या जागेवर का उभा राहिलास? म्हणून युवकावर अंगावर कार घातली

## डोंबिवलीत कारमालकाची मुजोरी

प्रतिनिधी
■ डोंबिवली

राज्यात ठिकठिकाणी अपघाताच्या घटनांचं प्रमाण वाढत आहे. हिट अँड रनच्या घटना वारंवार घडत असताना आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डोंबिवलीत चालकाने एका तरुणाच्या अंगावर कार घातल्याचा प्रकार समोर आला आहे. डोंबिवलीतील एका कार मालकाने तरुणाशी वाद घालत नंतर त्याची कार थेट अंगावर चढवण्याचा प्रयत्न केला.

ही जागा माझी खाजगी आहे, तुम्ही माझ्या या खाजगी जागेवर उभे का आहात? या कारणावरुन जागेच्या तसंच कारच्या मालकाने तिथे उभ्या असलेल्या तरुणाशी वाद घातला. त्यानंतर संतापलेल्या कारचालकाने आपली कार या तरुणाच्या अंगावर घालत त्याला काही अंतरापर्यत फरफटत नेलं. डोंबिवली पूर्वेकडील दावडी परिसरात हा प्रकार घडला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. या घटनेत तरुण संजय यादव जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात कार चालक मिलिंद ठाकरे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस फरार मिलिंद ठाकरे याचा शोध घेत आहेत. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

डोंबिवली दावडी परिसरातील तुकाराम नगर येथे संजय यादव हा तरुण राहतो. संजय हा एमआरचं काम करतो. शनिवारी रात्री साडे नऊ वाजताच्या सुमारास दावडी येथील शिवमंदिर परिसरात रस्त्याच्या बाजूला एका जागेवर उभे राहून त्याच्या मित्राशी बोलत होता. त्याचवेळी इथे मिलिंद ठाकरे नावाचा व्यक्ती त्याच्या जवळ आला.

ज्या जागेवर तुम्ही उभे आहात, ती जागा ही माझ्या खाजगी मालकीची आहे. त्या जागेवर उभे राहून का बोलत आहात? या कारणावरुन मिलिंद आणि संजय यांच्यात वाद झाला. त्यानंतर संजय घराकडे जाण्यासाठी निघाला. संजय हा घरी ज्या रस्त्याने जात होता त्या रस्त्यावर मिलिंद ठाकरे याने वॅगनार कार घेऊन संजयला मागून धडक देत, त्याला काही अंतरापर्यंत फरफटत नेल.

या घटनेत संजय यादव याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. मानपाडा पोलिसांनी या प्रकरणात मिलिंद ठाकरे याच्याविरोधात हत्येचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

## रयत शिक्षण संस्थेच्या वतीने कामगार नेते महेंद्र घरत यांचा सपत्नीक सत्कार



उरण । रयत शिक्षण संस्थेस रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्रशेठ घरत व त्यांच्या सौभाग्यवती शुभांगीताई महेंद्रशेठ घरत यांनी ५१ लाख रुपयांची देणगी दिली. त्या बद्दल रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सातारा येथे रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १२७ व्या जयंती निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शरदचंद्रजी पवार यांच्या शुभहस्ते त्यांचा कर्मवीर समाधी परिसर सातारा येथे विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चेरमन कर्मवीर अण्णांचे नातु डॉ अनिल पाटील ,साताऱ्याचे माजी खासदार श्रीनिवास पाटील ,रायगड चे माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच संस्थेचे देशभरातील पदाधिकारी,शिक्षक कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या लोककल्याणकारी योजना घरोघरी पोहचवणार

### – युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत निर्णय –

प्रतिनिधी
■ ठाणे



युवासेना ठाणे लोकसभा क्षेत्रातील युवासेना पदाधिकारी आणि युवासैनिकांची अत्यंत महत्त्वाची बैठक युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे येथील अनंत बँक्वेट्समध्ये पार पडली. या बैठकीत पक्ष संघटन आणि आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने युवा सैनिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी पुर्वेश सरनाईक यांनी उपस्थितांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत ठाण्यातून खासदार नरेश म्हस्के यांना सर्वाधिक लीड मिळवून देण्यात युवासेनेचे मोठे श्रेय आहे. विधानसभेच्या निवडणुका येत आहेत. मागील अडीच वर्षे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील प्रत्येक भागाचा विकास केला. मुख्यमंत्री १८-१८ तास काम करतात. अडीच वर्षे त्यांनी आपल्याला ताकद दिली. आता त्यांच्यासाठी प्रत्येक युवा सैनिकांनी विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले पाहिजे, असे आवाहन युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी युवा सैनिकांना केले.

मुख्यमंत्री महोदयांनी अनेक लोककल्याणकारी योजना आणल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून अनेक गरजू महिलांना दर महिना दीड हजार रुपये खात्यात जमा होत आहे. या योजनेला संपूर्ण राज्यभरातून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री साहेबांनी आणलेल्या या योजना आपल्या युवा सैनिकांनी घरोघरी पोहचवल्या पाहिजेत. पुढील ४५ दिवस आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक युवा सैनिकांनी दिवसातील एक तास हा संघटना वाढवण्यासाठी द्यावा, असे आवाहन पुर्वेश सरनाईक यांनी केले.

### रिपब्लिकन पक्षाची उल्हासनगर जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

## भगवान भालेराव यांची रिपब्लिकन पक्षातून हकालपट्टी - सुरेश बारशिंग

■ मुंबई

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची उल्हासनगर शहरजिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असून रिपाइं चे उल्हासनगर शहर अध्यक्ष भगवान भालेराव यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून रिपब्लिकन पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.पक्षविरोधी कृती करीत आल्यामुळे भगवान भालेराव यांची रिपब्लिकन पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्याची अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे सचिव, ठाणे प्रदेश संपर्क प्रमुख, पक्ष निरीक्षक सुरेश बारशिंग यांनी केली आहे.

रिपब्लिकन पक्षाचे उल्हासनगर शहर अध्यक्ष भगवान भालेराव यांना रिपब्लिकन चळवळीमुळे उपमहापौर पद प्राप्त झाले होते. पक्षाविरुद्ध कारवाई होत असल्याचे त्यांच्यावर आरोप झाले. त्यामूळे पक्षशिस्तभंगाची कारवाई म्हणून भालेराव यांना पक्षातून निलंबित करण्यात येत असून रिपब्लिकन पक्षाची उल्हासनगर शहर कार्यकारिणी बरखास्त करण्यात अल्याची अधिकृत घोषणा सुरेश बारशिंग यांनी केली.

# कर्जत नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराविरोधात जनआंदोलन उभे राहणार

प्रतिनिधी
■ कर्जत

गेली अनेक दिवस कर्जत नगरपरिषदेच्या विविध समस्या बाबत येथील नागरिकांनमध्ये असंतोष पसरला आहे.कर्जत नगरपरिषदेवर प्रशासक बसल्यापासून ह्या समस्यांमध्ये दुप्पट वाढ झाल्याचं चित्र दिसत आहे. रोजच त्याच त्याच समस्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत.परंतु गेंड्याच्या कातडीचे बनलेल्या या प्रशासनाला नागरिकांच्या समस्यांबाबत काही एक घेणे दिसत नाही.त्यामुळे या सर्व समस्या सोडविण्यासाठी आता जनआंदोलन उभे राहत आहे.

आज कर्जत शहर बचाव समिती ची बैठक शनिमंदिर हॉल मध्ये आयोजित करण्यात आली होती.



बैठकीत मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला होता. या बैठकीत नागरिकांनी विविध समस्यांचा पाढा वाचला. डॉ.गीता काळे यांनी आपल्या घरासमोरील मोकळया जागेत नेहमीच घाणीचे साम्राज्य आणि गाड्या अस्थ-वेस्थ पार्क केल्याने त्याचा त्रास होत असल्याचे सांगितले. सूमेश शेट्टे यांनी क.न.प.जागेत गाळे आणि पार्किंग व्यवस्था केली तर कर्जत बाजार पेठेतील ट्रॅफिक चा प्रश्न मार्गी लागेल.रजाभाऊ कोठारी यांनी कर्जत शहरातील इमारती मध्ये पार्किंग मध्ये गाळे उभारले आहेत त्यावर कारवाई केली तर नक्कीच रस्त्यावर उभी राहणारी वाहनांची संख्या कमी होईल.प्रभाकर करंजकर यांनी तर नगरपरिषदेचे एक गुपित बाहेर काढले,फवारणीसाठी चंगल्या प्रतीचे केमिकल न वापरता फक्त डिझेल फोग तयार केला जातो. तसेच जे केलिकल वापरले जाते ते हलक्या दर्जाचे वापरले जात आहे ही नागरिकांची फसवणूक आहे. क. न. प विरोधातील आंदोलन हे मुक आंदोलन नको अशी मागणी त्यांनी केली.तर अधिकाऱ्यांना घेराव घालून त्यांना नैसर्गिक विधी पासून रोखून आपल्या समस्या सोडविण्यासाठी भाग पाडलं पाहिजे असे सुचविले. राजेश लाड यांनी सध्या प्रशासक नेमल्या पासून आठ महिन झाले परंतु क. न. प.ची मुख्य जबाबदारी असणारे मुख्यधिकरी नागरिकांच्या प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर कधी दिसले नाही.काम करण्याचा प्रामाणिकपणा असेल तर बदल नक्की घडू शकतो. अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे कर्जतच्या समस्या जटिल बनत चाललेल्या आहेत. वसंत मोधले यांनी नानामास्तर नगर येथील रस्त्यावर गतिरोधक बसविण्यासाठी गेले अनेक दिवस केलेली लेखी मागणीला देखील मुख्यधिकरी उत्तर देत नाही.तसेच या भागात अनेकांनी अनधिकृतपणे नळाला मोटार लाऊन पाणी घेत असल्याने काही भागात पाणी येत नाही अशी तक्रार केली असता हे प्रशासन सांगत की तुम्ही देखील मोटारी लावा.या बैठकीत नागरिक कर्जत नगरपरिषदेच्या विरोधातील रोष व्यक्त करताना दिसत होते. यावेळी मोहन ओसवाल,सोमनाथ पालकर स्विटी बार्शी,सुनील गोगटे,नितीन परमार,मोहन देशमुख यांच्यासहअनेकांनी विविध समस्या मांडल्या.

या बैठकीत कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने बुधवार दि २५ रोजी आपल्या समस्या सोडविण्याचे निवेदन देण्याचे ठरले असून सोमवार पर्यंत कर्जत नगरपरिषद यांच्या कडून या सर्व समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न दिसले नाहीतर आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येईल असे जाहीर केले.

## रास्त धान्यासाठी तीन तासांची रांग

**पनवेल :** प्रती माणसी तीन किलो गहु आणि चार किलो तांदुळ सरकार मान्य रास्त धान्य दुकानातून मिळविण्यासाठी कुटूंबातील मोठ्यांसह लहानग्यांना रांगेत तासंतास ताटकळत उभे रहावे लागत आहे. तीन तासांपेक्षा अधिक वेळ रांगेत उभे राहूनच रेशनवरील धान्य मिळेल याची खात्री नसल्याने रहिवाशी संताप व्यक्त करत आहे. ही गोंधळाची स्थिती पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली उपनगरातील सरकार मान्य रास्त धान्य दूकान क्रमांक ३ वरील आहे. रेशनींगचे धान्य मिळविण्यासाठी संबंधितांनी केवायसी करणे गरजेचे असल्याने रेशन दूकानावरील पॉझमशीन व्यवस्थीत चालत नसल्याने खोळंबा होत आहे.

## भटक्या श्वानाचा मारहाणीत मृत्यू, क्रिकेटच्या बॅटने डोक्यावर आघात

प्रतिनिधी
■ ठाणे

येथील घोडबंदर मोघरपाडा भागातील फियामा रेसिडेन्सी येथे एका व्यक्तीने भटक्या श्वानाच्या डोक्यात क्रिकेटच्या फळीने मारल्याने श्वानाचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी उघडकीस आली. या प्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घोडबंदर येथील मोघरपाडा ओवळा या भागातील फियामा रेसीडन्सी मधील गोकुळ थोरे (३५) यांनी एका भटक्या श्वानाच्या डोक्यात फळी मारल्याची घटना घडली. या मारहाणीत डोक्याला मार लागल्याने श्वानाला फिट येत होत्या. याबाबत अल्फा फाऊंडेशन या प्राणीमित्र संघटनेला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

त्यांनी जखमी श्वानाला ब्रह्मांड येथील सी.पी.सी ए रूग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचाराकरिता श्वानाला ऐरोलीमधील कार्थिकस पेट ॲनिमल दवाखान्यात नेण्यात आले. मात्र शुक्रवारी दुपारच्या सुमरास श्वानाच्या मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गोकुळ थोरे यांच्या विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## आंबेडकरी समाजाने युतीला मदत करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवावी - भीमराव हत्तीअंबीरे

प्रतिनिधी
■ वसमत

आंबेडकरी समाजाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष युतीला सहकार्य करणारे पक्ष ओळखले पाहिजेत व त्यांच्या भूलथापाला बळी पडू नये. स्वतःला आंबेडकरवादी म्हणून घेऊन संविधान संपवणाऱ्याशी काहीजण हातमिळवणी करीत आहेत या मतविभाजन करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा.जागरूक राहून मतदान करावे. असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रभारी भीमराव हत्तीअंबीरे यांनी केले.

१७ सप्टेंबर रोजी वसमत येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या कार्यशाळेत उदघाटक म्हणून बोलतांना भीमराव हत्तीअंबीरे म्हणाले की, युतीच्या जातीयवादी सरकारने आंबेडकरी जनतेवर सतत अन्याय केला आहे.अनेक योजना बंद केल्या आहेत.तसेच,हिंगोली जिल्ह्यातील सर्व विधानसभेत आघाडीचा उमेदवार विजयी होण्यासाठी एकजुटीने कामाला लागा. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर हे होते. ते म्हणाले की,संविधान वाचण्यासाठी आपल्या सर्वांची भूमिका फार महत्वाची असून एकजुटीने मतदान करून युतीला धडा शिकवा. असे आवाहन करून

२०० पेक्षा ज्यास्त जागा महाराष्ट्रात आघाडीच्या निवडून येतील असेही ते म्हणाले. यावेळी हजारो नागरिक उपस्थित होते. शेकडो कार्यकर्ते यांनी आज राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

## सत्ताधारी- विरोधकांचे नाते दात व जिभेसारखे, पण राजकारणाचा स्तर आता खालावला

### नाना पाटेकरांची खंत

प्रतिनिधी
■ पुणे

जलसंधारणासह आरोग्य, शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नाम फाउंडेशनच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी राज्यातील सध्याच्या राजकारणावर कडक ताशेरे ओढत राजकारणाचा स्तर घसरल्याची खंत व्यक्त केली. सत्ताधारी व विरोधकांचे नाते दात व जिभेसारखे असून त्यांनी गुण्यागोविंदाने राहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नाम फाउंडेशनच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात सर्वच राजकीय पक्षांनी जलसंधारणाच्या कामात मदत केल्याचे स्पष्ट केले. मी कुठल्याही राजकीय पक्षाचा नसल्याचे सांगत, सर्वच पक्षांमध्ये माझे मित्र असल्याचे पाटेकर यांनी यावेळी सांगितले. मात्र, सध्या राजकारणाचा स्तर खालावला असल्याची खंत व्यक्त करत पूर्वीचे राजकारणाचे दिवस छान होते, ते आता का नाहीत, असा सवाल केला. सत्ताधारी व विरोधक यांचे नाते जीभ व दात असे असल्याचे सांगत सत्ताधाऱ्यांनी जीभ चावायची नाही, असा सल्ला देत कान



टोचले. तर, काही चुकीचे असेल तर ते सभ्य भाषेत सांगण्याची जीभेची जबाबदारी असते, अशा कानपिचक्या त्यांनी विरोधकांना दिल्या. ज्या दिवशी हे साध्य होईल, त्या दिवशी राजकारणाचा स्तर उंचावलेला असेल असेही ते सांगण्यासही ते विसरले नाहीत. सध्याच्या राजकारणाच्या स्तरावर मनात कायमच किंतु-परंतु असतो, असे ते म्हणाले.

वैयक्तिक आयुष्यात अनेक राष्ट्रीय राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले. मात्र, नाम फाउंडेशनमध्ये काम केल्यानंतर जे समाधान मिळते त्यासारखा मोठा सन्मान नाही, अशी कृतज्ञताही त्यांनी यावेळी व्यक्त केली. रात्री झोपताना असणारा आनंद हा वेगळाच असून आपल्या कामामुळे कुणाच्या तरी चेहऱ्यावर हसू आले याचे समाधान असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# वेळ आली तर देईन जान, पण बदलू देणार नाही संविधान !

## रामदास आठवले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

कोकण निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. येथे आंबा, काजुसह मासेमारी हे प्रमुख व्यवसाय चालतात. परंतु येथील तरूणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी येथे उद्योग येणे आवश्यक आहे. देश, राज्याच्या तुलनेत गेल्या 30 ते 35 वर्षात रत्नागिरी जिल्ह्यात ॲस्ट्रॉसिटीच्या केवळ 305 केसेस दाखल झाल्या आहेत. यावरून रत्नागिरीत सामाजिक न्यायाचा सलोखा उत्तम असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. तर 'वेळ आली तर देईन माझी जान, कोणालाही बदलू देणार नाही देशाचे संविधान' या शायरीने ना.आठवले



यांनी भाषणाला सुरूवात केली.

रिपब्लिकन पाट ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने ना.रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात वण लागल्याबद्दल जिल्ह्याच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या सत्कारा‍ला उत्तर देताना आठवले बोलत होते. जिल्ह्याच्या वतीने भव्य पुष्पहार घालून आकर्षक सन्मानचिन्हाने ना.आठवले यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ना.आठवले म्हणाले, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा डॉ. बाबासाहेब आंबेमडकर यांचा पक्ष आपण चालवत आहोत.

महाराष्ट्रासहीत देशातील 35 हून अधिक राज्यांमध्ये आरपीआय सक्रीय आहे. पक्ष छोटा असला तरी माणसं जमतात. मी सत्तेत सहभागी असलो तरी स्थानिक पातळीवर सत्तेचा वाटा मिळत नाही ही वस्तुस्थिती असली तरी बाबासाहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे हे एकमेव ध्येय आपले आहे. देशातील सर्वसामान्य नागरिक माझ्यासोबत आहेत. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल तिसऱ्यांदा आपल्याला मंत्रिपदाची संधी दिल्याचे आठवले यांनी सांगितले.

आरपीआयमार्फत मी एकमेव राज्यसभेचा खासदार आहे. माझ्या पक्षाला सभागृहात बोलायला कमी वेळ मिळतो म्हणून मी शायरीच्या माध्यमातून कमी शब्दात माझ्या भावना सभागृहात मांडत असतो. काहींना ते पटत नाही. परंतु मला पटते ते मी करतो, असे आठवले यांनी सांगितले.

आरपीआयच्या माध्यमातून दिल्ली दरबारी बाबासाहेबांचे विचार मांडण्याचे काम आपण करत असतो व मरेपर्यंत मी आरपीआयचे नाव पुसू देणार नाही. अनेकजण पक्ष बदलतात, पक्षांची नावे बदलतात. परंतु रामदास आठवले अखेरपर्यंत आरपीआयमध्येच दिसेल. कॉंग्रेसकडून संविधान बदलाचा अपप्रचार केला गेला. परंतु बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान कोणीही बदलणार नसल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले.

# आशियात भारतीय हॉकी संघाचाच 'दरारा'




सुहास जोशी
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

चीनमध्ये झालेल्या आशिया खंडातील प्रतिष्ठेच्या आशियाई चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेत भारतीय पुरुष संघाने आपले विक्रमी पाचवे विजेतेपद पटकावून आशियात भारतीय हॉकीचाच "दरारा" असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले. या स्पर्धेत भारतीय संघाने गतवेळचे अजिंक्यपद कायम राखताना जेतेपदाला साजेशी कामगिरी करुन आपणच या स्पर्धेचे विजेतेपदाचे दावेदार असल्याचे दाखवून दिले. संपूर्ण स्पर्धेत सर्व सामने जिंकणारा भारत हा एकमेव संघ होता. त्यामुळेच भारतीय संघाचे हे यश अधिक उल्लेखनीय म्हणावे लागेल. ऑलिम्पिक नंतर झालेल्या या स्पर्धेत भारतीय हॉकी महासंघाने काही प्रमुख खेळाडूंना विश्राती दिली. तर काही युवा खेळाडूंना आशियाई स्पर्धेत संधी दिली. अशा परिस्थितीत देखील शानदार खेळ करुन भारताने आपली विजयाची मोहोर उमटविली. विशेष म्हणजे २०११ साली चीनने या स्पर्धेचे प्रथमच आयोजन केले होते. तेव्हा देखील भारतीय संघच विजयी ठरला होता. आता तब्बल १३ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर झालेल्या या दुसऱ्या स्पर्धेत त्याच विजयाची भारतीय संघाने पुनरावृत्ती केली.

यंदाच्या स्पर्धेत यजमान चीनला ३-० असे सहज नमवून भारताने आपल्या विजयी अभियानाला प्रारंभ केला. मग त्यानंतर एकापाठोपाठ एक सरस विजय मिळवून भारताने रुबाबात अंतिम फेरीत प्रवेश केला. निर्णायक लढतीत पुन्हा एकदा यजमान चीनवर मात करुन भारताने विजयाला गवसणी घातली. प्रथमच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळणाऱ्या चीनी संघाने भारताला विजयासाठी चांगलेच झुंजवले. पहिल्या तीन सत्रात गोलफलक कोराच राहिला. अखेर चौथ्या सत्रात जुगराज सिंग भारताच्या मदतीला धावून आला. त्यानेच एक शानदार गोल करुन भारतीय विजयास मोठा हातभार लावला. मग हीच आघाडी भारतीय संघाने भक्कम बचाव करुन सामन्यातील शेवटच्या सेकंदापर्यंत कायम राखली. चीन विरुद्ध झालेल्या आतापर्यंत १० लढतीत भारताचा हा ९वा विजय होता. २०१३च्या या स्पर्धेत चीनने भारताला नमविण्याचा पराक्रम केला होता. आशियाई स्पर्धेत झालेल्या आतापर्यंतच्या ६ लढतीत भारताचा चीनवर पाचवा विजय होता.

आता आशिया खंडात चीनचा हॉकी संघ नवी ताकद म्हणून उदयाला येत आहे. कारण या स्पर्धेत त्यांनी बलाढ्य पाकिस्तानचा उपांत्य फेरीत पेनेल्टिशुटआऊटमध्ये पराभव करुन धक्कादायक विजयाची नोंद केली होती. साखळी लढतीत पाकिस्तानने त्यांचा ५-१ असा दणदणीत पराभव केला होता. त्या पराभवाचा बदला तर चीनने उपांत्य फेरीत लगेचच घेतला. दुसऱ्या उपांत्य लढतीत भारताने मात्र द. कोरियाचा ४-१ गोलाने आरामात पराभव केला. भारतीय कर्णधार हरमनप्रित सिंगने पेनेल्टीकॉर्नरवर दोन शानदार गोल केले. नवोदित उत्तम सिंह, जरमनप्रित सिंगने प्रत्येकी एक गोल करुन भारतीय विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या अगोदर साखळी लढतीत भारताने द. कोरियाला ३-१ असे नमविले होते. पारंपारिक भारत पाकिस्तान या दोन संघातील लढतीकडे दोन्ही देशांच्या हॉकी प्रेमींचे लक्ष होते. या सामन्यात अटीतटीच्या लढतीत भारताने २-१ अशी बाजी मारली. भारतीय विजयात कर्णधार हरमनप्रित सिंग याचाच मोलाचा वाटा होता. त्यानेच दोन्ही गोल केले.


२०१६ पासून भारताचे पाकिस्तानवर नेहमीच वर्चस्व राहिले आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. गतवर्षी आशियाई स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा १०-२ गोलांनी धुव्वा उडवला होता. तर २०२२च्या चेन्नईत झालेल्या या स्पर्धेत भारताने पाकिस्तानला ४-० असे नमविले होते. ज्याप्रमाणे क्रिकेटमध्ये भारतीय संघ पाकिस्तानला सहज नमवू लागला आहे, त्याचाच प्रत्यय आता हॉकीदेखील येऊ लागला आहे असे म्हणावे लागेल. अलिकडच्या काळात चांगल्या खेळाडूंची वानवा पाकिस्तानी संघात जाणवते. तसेच तेथील संघटनेमधील गलिच्छ राजकारणामुळे या दोन्ही खेळात पाकिस्तानची गच्छती सुरु झाली. भविष्यात हे चित्र बदलले नाही तर या दोन्ही खेळात पाकिस्तानचे काही खरे नाही. कांस्य पदकाच्या लढतीत पाकिस्तानने द. कोरियाचा ५-३ असा पराभव करुन शेवटी थोडीफार आपली अब्रू वाचवली. भारताने या अगोदर २०११, २०१६, २०१८, २०२३ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती. यजमान असताना ही स्पर्धा जिंकणारा भारत हा एकमेव देश आहे.

भारताने या स्पर्धेत साखळी लढतीत चीनचा ३०, जपानचा ५०, मलेशियाचा ८१, द. कोरियाचा ३- १ आणि पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला होता. धारदार आक्रमण आणि भक्कम बचाव हेच भारतीय संघाच्या यशाचे गमक होते. पेनेल्टीकॉर्नर आणि मैदानी गोल करण्यावर जास्तीत जास्त भर भारतीय संघाने दिला. त्यामुळेच भारताने या स्पर्धेत सफाईदार विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच वेगवान आक्रमण करायचे आणि गोल करून आघाडी घ्यायची ही नवी रणनीती भारताने या स्पर्धेत आखली होती. ती यशस्वी झाली असेच म्हणावे लागेल. स्पर्धेतील एकूण झालेल्या ७ पैकी ५ सामन्यात सुरुवातीच्या पहिल्या सत्रात गोल करण्यात भारतीय संघ यशस्वी ठरला होता. नवोदित गोलरक्षक पाठक, करकेरा यांनी शानदार गोलरक्षण करुन श्रीजेशची उणीव जाणवू दिली नाही. या स्पर्धेत भारतीय संघावर अवघे ५ गोल लागले. तर भारताने या स्पर्धेत तब्बल २६ गोलांची नोंद केली. भविष्यात श्रीजेशसारख्या कामगिरीची या दोघांकडून अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

ऑलिम्पिकप्रमाणेच भारतीय कर्णधार हरमनप्रित सिंगने पुन्हा एकदा या स्पर्धेवर आपल्या जादुई खेळाची छाप पाडली. भारतीय विजयात त्याने आपली भूमिका चोख पार पाडली. त्यांनीच या स्पर्धेत सर्वाधिक ७ गोल केले. तसेच पेनल्टीकॉर्नरवर हमखास गोल करण्याचा धडाका हरमनप्रितने येथे देखील कायम राखला. हरमनप्रित सिंगला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला. या पुरस्काराचा तोच खराखुरा मानकरी होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. हरमनप्रितला संघातील युवा खेळाडूंची चांगली साथ मिळाली. अभिषेक, संजय, उत्तम सिंग, सुखजित सिंग, राजकुमार, जुगराज या युवा खेळाडूंनीदेखील स्पर्धेत चांगली कामगिरी करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भारताने या स्पर्धेची ६व्यांदा अंतिम फेरी गाठली होती. ६ पैकी ५ वेळा भारताने अंतिम लढत जिंकली. २०१२च्या दोहा येथील स्पर्धेत भारताला अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. तो अपवाद वगळला तर इतर वेळा भारताचीच सरशी झाली आहे.

ऑलिंपिकमधील कांस्य पदक आणि त्यापाठोपाठ लगेचच आशियाई चॅम्पियनशीप स्पर्धेचे विजेतेपद ही भारतीय हॉकीला नवी संजीवनी देणारी ठरेल. अशी आशा करायला हरकत नाही. येणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत भारतीय संघ अशीच सातत्यपूर्ण दमदार कामगिरी करेल. हेच चित्र सध्यातरी दिसत आहे. यंदाच्या आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या वर्षातील सर्वोत्तम हॉकी खेळाडूसाठी भारतीय कर्णधार हरमनप्रित सिंग आणि सर्वोत्तम गोलरक्षकासाठी श्रीजेश या दोघांना या दोन पुरस्कारांसाठी नामांकन मिळाले आहे. हे दोन्ही पुरस्कार भारताच्या या स्टार खेळाडूंना मिळतील अशी खात्री भारतीय हॉकी प्रेमी बाळगून असतील.

## अक्षर श्रीमंत करणारे गुरुजी



**अक्षरांची ओळख** देणारी वरळी नाक्यावरील मुंबई म्युनिसिपालिटीची (१९६०-१९६२ दरम्यान ) आमची शाळा. इयत्ता पाचवी ते सातवी शिकत असताना आमच्याकडून कुणी हिरावून घेऊ शकत नाही अशी अक्षर श्रीमंती देण्यासाठी झटणारे आमचे लाडके कै. मोतिराम गावडे गुरुजी, आजही मूर्तिमंत आठवतात, त्यांची शिस्त आठवते आणि प्रसंगी मार आणि प्यार सुद्धा. आमच भाग्य त्यांची शिकवण आम्हाला लाभली. आमच्या जीवनाचा पाया मजबूत, सुदृढ होण्यासाठी. स्वच्छ, सुंदर अक्षराचे महत्व, सामाजिक कार्याची जाण आणि आवड बालवयातच गावडे गुरुजींनी स्वताच्या व्यक्तिमत्वातून आम्हास नकळत करून दिलेली आमची कायमस्वरूपी शिदोरी नव्हे आमच्या लहान वयातच बिंबवली . शिक्षणा सोबतच त्यांनी घालून दिलेला जीवनधडे सुद्धा जीवनभर सोबत करताहेत. ध्येयाने झपाटलेले व्यक्तिमत्व आकाशा एवढच उत्तुंग होतं आमच्या गुरुजींच. आपल्या पेशाला, ध्येयाला, घेतला वसा प्राणपणाने जपणारा. माझा विद्यार्थी जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी त्याची अक्षर श्रीमंती दिसली पाहिजे, लोकांनी त्याचं कौतुक करायला हवं हाच त्यांचा ध्यास असे. विद्यार्थ्यांना शाईचा पेन अथवा त्या काळी बाजारात नुकतेच उदयाला येऊ घातलेले आत्ताचे सर्रास वापरले जाणारे बॉल पेन जरी गुरुजींच्य नजरेस पडले, दप्तरात सापडले तरी ते मोडून टाकत, शिक्षा देतच शिवाय पालकांना निरोप पाठवीत पेन न देण्याचा आदेशच देत. फक्त आणि फक्त टाक, बोरू आणि शाईची बाटली हेच आमचं लिखाणाचं साधन असायचं. यासाठी गुरुजी स्वखर्चानं प्रत्येकाला नीब टाक द्यायचे शिवाय नीब सुद्धा विशिष्ट प्रकारे घासून, कट करून (पैलू पाडून) प्रत्येक विद्यार्थ्याला देत असत ना कसली अपेक्षा ना कसला स्वार्थ. माझ्या विद्यार्थ्याचे अक्षर मोत्यासारखे झालं पाहिज या भावनेने अपार मेहनत घेत. शिस्त कडक होती आणि शिक्षाही कठीण असे, प्रसंगी कौतुकही करावे ते गावडे गुरुजींनी. साधारण एक वाजता शाळा सुटल्यानंतर संध्याकाळी चार वाजेपर्यंत त्यांचा कुठलाही विद्यार्थी हा बाहेर खेळताना आढळता कामानये असा त्यांचा दंडकच होता आणि कुणी दिसलाच तर दुसऱ्या दिवशी शिक्षा ही असायचीच त्यासाठी विद्यार्थी राहात असलेल्या ठिकाणी भरदुपारी ते सायकलने वरळीभर फिरून चार पूर्वी कुणी विद्यार्थी बाहेर खेळताना दिसतो का हे आवर्जून पहात, नजर ठेवीत आणि आढळल्यास दुसऱ्या दिवशी शिक्षाही ठरलेली तीस ओळी लिहून आणण्याची. गृहपाठा सोबत रोज किमान वीस ओळी बोरूने अथवा टाकाने स्वच्छ सुंदर अक्षरात प्रत्येकाने रोज एक उतारा लिहून आणलाच पाहिजे हा दंडक होताच त्यामुळे आमच्या वर्गातील सर्वच मुलांची अक्षर सुंदर, सुबक आणि स्वच्छ असत. शाळा, शिक्षण आणि विद्यार्थी हेच त्यांचे जग होत, जीवन होतं. शाळेत गावडे गुरुजींचा विद्यार्थी म्हणून घ्यायला नेहमीच अभिमान वाटे, गर्व वाटे. कोणत्याच विषयात आपला विद्यार्थी मागे राहता कामा नये त्या साठी गुरुजी स्वतःच्या बी. डी.डी. चाळीच्या एक खोली घरात आमच्या शिकवण्या घेत विनामूल्य, निरपेक्षपणे. एकच ध्यास माझा विद्यार्थी चमकदार हवा. आजही त्यांनी शिकवलेले धडे, सामान्य ज्ञान, इतिहास आणि ते स्वता स्मरणात आहेत. कामगार वस्तितील गरीब मुले, गरिबांची मुले उद्याच्या मोठ्या जगात वावरतांना धीटपणे वावरावीत, कार्तृत्ववान व्हायला हवीत हेच स्वप्न घेऊन ते जगत त्यासाठी त्यांची कायम धडपड असे. अशा या माझ्या कायम स्मरणात असणाऱ्या गावडे गुरुजींना शतशा प्रणाम.

**विश्वनाथ पंडित, ठाणे**

## लहान मुलांच्या हौस-मजेसाठी 'तान्हा पोळा'

**तान्हापोळा** बहुतेक लहान मुलांच्या विरंगुळ्यासाठी साजरा करण्याची प्रथा आहे. बैल पोळ्याच्या पाडव्याला नागपूरसह पूर्व विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा केल्या जातो. ही ऐतिहासिक परंपरा असलेल्या या पोळ्याची सुरूवात राजे रघुजी भोसले यांनी केली होती. तेव्हा पासुन तान्हा पोळा साजरा करतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा शहराचा अनोखा सण विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे.



भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी 'तान्हा पोळा' साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले लाकडापासून तयार केलेला बैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या लाकडाच्या बैलाचा तान्हा पोळा साजरा करतात. या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो. प्रसंगी महादेवाची गाणी वाजविली जातात. नंदी बैल भगवान महादेवाचे वाहन असल्या कारणाने महादेवाच्या नावाचा जयजयकार केल्या जातो. त्यानंतर मुलांना काकडी व खोबऱ्याचा प्रसाद वाटप केल्या जाते. आणि पोळा फुटला असे जाहीर केल्या जाते. गेल्या काही वर्षांपासुन या पोळ्याला संस्कृती व स्पर्धा याची झालर लागली आहे. अनेक पालक आपल्या मुलाला वेगवेगळ्या वेशभुषांमध्ये सजवुन आणतात. पोळा फुटायच्या आधी या सगळ्या छोट्या मुलांचे वेशभुषा निरीक्षण केले जाते. तसेच त्यांनी सजावुन आणलेल्या बैलाचे निरीक्षण केले जाते. पोळा फुटल्यानंतर उत्तम वेशभुषा व बैलाची उत्तम सजावट केलेल्या मुलांना क्रमांका प्रमाणे नंबर देऊन, त्यांना योग्य ते पारितोषिक दिल्या जाते. त्याचप्रमाणे सगळ्याच मुलांना काहीनाकाही छोटी भेटवस्तु दिली जाते. त्यानंतर ही मुले घरी येतात. ज्याप्रमाणे मोठ्या बैलांची सर्व प्रथम घरी पुजा केल्या जाते. त्याचप्रमाणे या लाकडी बैलांच्या पूजेला देखील घरुन सुरुवात होते. त्यानंतर ही मुले आपल्या शेजारी व नातेवाईकांकडे जाऊन 'बोजारा' जमा करतात, म्हणजे त्यांना पैसे किंवा भेटवस्तु दिल्या जाते. लहान मुलांना देखील शेतीचे व त्यात राबराब राबणाऱ्या बैलांचे महत्व कळावे. आपल्या कृषीप्रधान संस्कृती विषयी ते कृतज्ञ राहावे, यासाठी कदाचित तान्हा पोळा हा सण साजरा करण्याची प्रथा विदर्भात रुजली असावी. यामुळे लहान मुलांमध्येही बैल या पशुधनाबाबत माहिती होऊन महाराष्ट्रीयन संस्कृती जपल्या जाते.

नागपूरसह विदर्भातील जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तान्हापोळ्या निमित्त सगळ्याच वयोगटातील लोक लाकडी बैल घेऊन त्याची पुजा करून हा सन आनंदाने साजरा करतात. नागपुरातील या सणाला तब्बल २३५ वर्षांचा इतिहास आहे. त्यातच नागपुरातील सनियर भोसला पॅलेसमधील तब्बल आठ फुट उंचीचा लाकडी बैल सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नागपुरातील लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्याला २३५ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बैलांचा सण म्हणून साजरा होतो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळ्याला शहरातील अनेक भागात लाकडी बैलांचा पोळा भरतो. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा होत नाही.

नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांनी लहान मुलांना बैलांचे महत्त्व कळावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून सर्व लहान मुलांना वाटले. जिवंत बैलांप्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून जिलेबी, फळे, चॉकलेट, बिस्कीट पुडे अशा विविध वस्तू तेथे बांधण्यात आल्या. बैलाजवळ मुलांना उभे करून बैलांची पूजा केली जायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकीचे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटले जायचे.

**- सुदाम खारकर**



## क्वीन्सलँड बॅडमिंटन स्पर्धेत चिन्मय ढवळे -अजय कृष्णन दुहेरीचे विजेते

**सिडनी :** नुकत्याच ऑस्ट्रेलियाच्या क्वीन्सलँड बॅडमिंटन असोसिएशनने एकेरी, दुहेरी, मिश्र दुहेरी, महिला एकेरी व दुहेरी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धा ओपन ए ,बी ,सी व डी ग्रुप मध्ये ठेवण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत भारतीय जोडी चिन्मय ढवळे मुंबई व अजय कृष्णन केरळ यांनी " बी " ग्रुप मध्ये दुहेरीचे विजेतेपद मिळवले. या गटात एकूण 14 जोड्यांनी भाग घेतला होता. व एक गेम 31 पॉईंटचा होता. या स्पर्धा राऊंड रॉबिन पद्धतीने घेण्यात आल्या व त्यातून प्रथम चार जोड्यांची सेमी फायनल साठी निवड करण्यात आली. चिन्मय ढवळे व अजय कृष्णन यांनी सेमी फायनल मध्ये नंबर वन सीडेड लुकान लान व दवे नऊंग या जोडीवर 31- 22 असा विजय मिळवून अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला. त्यांनी अंतिम फेरीमध्ये तिसऱ्या मानांकित सुमित पुरी व राजेश वर्गीस या जोडीवर 31-15 अशी सहज रीत्या मात करून दुहेरीचे विजेतेपद पटकावले. तर उपविजेते पद सुमित पुरी व राजेश वर्गीस यांना मिळाले. चिन्मय ढवळे हा मुंबईचा असून त्याला सुरुवाती च्या काळात आयकर विभागाचे माजी निरीक्षक व आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू मिलिंद पूर्णपात्रे यांचे मार्गदर्शन लाभले होते.



# अश्विन अण्णाच्या दुहेरी कामगिरीपुढे बांग्लादेश 'ढेर'

- भारताने चेन्नई कसोटी जिंकली, बांगलादेशचा 280 धावांनी पराभव केला
- अश्विनचे शतक, 6 विकेटही
- तीन भारतीय फलंदाजांची शतके





वृत्तसंस्था
■ चेन्नई

टीम इंडियाने बांगलादेशविरुद्धची पहिली कसोटी 280 धावांनी जिंकली आहे. रविवारी 515 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाने बांगलादेशला दुसऱ्या डावात 234 धावांत आटोपले.

2 कसोटी सामन्यांच्या मालिकेत संघाने 1-0 अशी आघाडी घेतली आहे. दुसरा सामना 27 सप्टेंबरपासून कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर होणार आहे.

या विजयाचा हिरो होता रविचंद्रन अश्विन. त्याने 6 विकेट घेतल्या. तसेच पहिल्या डावात 113 धावा केल्या. बांग्लादेशकडून कर्णधार नझमुल हसन शांतोने (82 धावा) अर्धशतक झळकावले. बांग्लादेशी संघाने 158/4 धावसंख्येवरून खेळण्यास सुरुवात केली. शांतोने 51 तर शाकिबने 5 धावा करत डाव पुढे नेला. शांतो ८२ धावा करून बाद झाला तर शाकिब २५ धावा करून बाद झाला. भारतीय कर्णधार रोहित शर्माने दुसरा डाव 4 गडी बाद 287 धावांवर घोषित करून बांग्लादेशला 515 धावांचे लक्ष्य दिले. टीम इंडियाने पहिल्या डावात 376 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांग्लादेशचा पहिला डाव 149 धावांत आटोपला.

हसन आणि तस्किन यांनी चांगली गोलंदाजी केली आणि दोघांनीही चांगली फलंदाजी केली. आमची गोलंदाजी चांगली होती, पण आम्हाला सातत्य राखावे लागेल. मी जास्तीत जास्त वेळ फलंदाजी करण्याचा प्रयत्न करत होतो. ही आमच्यासाठी खूप महत्त्वाची मालिका आहे. पुढच्या सामन्यात आम्ही काहीतरी चांगले करू अशी आशा आहे.

**रोहित शर्मा म्हणाला हा विजय आमच्यासाठी महत्त्वाचा**

*हा विजय आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. पंत कठीण काळातून गेला आहे. त्याने ज्या पद्धतीने या गोष्टींना तोंड दिले ते आश्चर्यकारक आहे. त्याला हे स्वरूप सर्वात जास्त आवडते. तो किती कर्तबगार होता हे आम्हाला नेहमीच माहीत होते. त्याला खेळासाठी वेळ देणे ही बाब होती. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत अशीच टीम तयार करायची आहे. वेगवान गोलंदाजी किंवा फिरकीमध्ये आमच्याकडे पर्यायांची कमतरता नसावी अशी आमची नेहमीच इच्छा असते. ही खेळपट्टी अगदी सोपी होती. वेगवान गोलंदाजांसाठी आणि फिरकीपटूंनाही खूप मदत मिळाली. ही अशी खेळपट्टी होती जिथे तुम्हाला संयम दाखवावा लागतो. अश्विन सदैव तुमच्या सोबत आहे. काय करावे आणि काय करू नये तो सांगत राहतो. तो संघासाठी काय करतो यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.*

**कानपूरच्या दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडियात बदल नाही**

*बांग्लादेशविरुद्ध २७ सप्टेंबरपासून कानपूर येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पहिला सामना जिंकल्यानंतर बीसीसीआयने रविवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे - 'पुरुष निवड समितीने बांग्लादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी तोच संघ कायम ठेवला आहे. बांग्लादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी बोर्डाने १४ दिवसांपूर्वी ८ सप्टेंबरला संघ जाहीर केला होता. या संघात यश दयाल यांना प्रथमच संधी देण्यात आली. तर, केएल राहुल, ऋषभ पंत आणि विराट कोहली यांनी पुनरागमन केले होते.*

## चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक



अर्जुनने खुल्या गटातील शेवटचा सामना जिंकून भारताचे सुवर्णपदक निश्चित केले.

- खुल्या सांघिक गटात देशाचे पहिले सोनेरी पदक
- महिला संघही पदकाच्या शर्यतीत

वृत्तसंस्था
■ बुडापेस्ट

बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या खुल्या गटात भारताने ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले आहे. ऑलिम्पियाडच्या 97 वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारताने सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. बुडापेस्ट येथे झालेल्या 10व्या फेरीच्या सामन्यात भारताने अमेरिकेचा 2.5-1.5 असा पराभव केला. भारताचे एकूण १९ गुण आहेत. 10 फेऱ्यांपैकी भारताने 9 जिंकले असून 1 फेरी अनिर्णित राहिली आहे.

रविवारी अंतिम फेरीचा सामना होणार आहे. या फेरीत भारतीय संघ हरला तरी संघ पहिल्या स्थानावर राहणार हे जवळपास निश्चित आहे. खुल्या गटात भारत सुवर्णपदक जिंकल्याची अधिकृत घोषणा खेळाच्या 11 व्या फेरीनंतर केली जाईल.महिला गटात भारत अजूनही सुवर्णपदकाच्या शर्यतीत आहे. भारतीय मुलींनी 10व्या फेरीत गतविजेत्या चीनचा 2.5-1.5 अशा फरकाने पराभव केला. या प्रकारात भारत सध्या पहिल्या क्रमांकावर आहे.

**गुकेशने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाचा पराभव केला**

खुल्या गटातील 10व्या फेरीत भारताचा सामना अमेरिकेशी झाला. खुल्या गटात, संघात पुरुष आणि महिला दोन्ही खेळाडू असू शकतात. मात्र, बहुतांश संघांमध्ये खुल्या गटात केवळ पुरुष खेळाडू हेत.अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात डी.गुकेशने बोर्ड-1 वर फॅबियानो कारुआनाचा पराभव केला. कॅरुआना जागतिक क्रमवारीत नंबर-2 खेळाडू आहे. प्रज्ञानंद यांना बोर्ड-2 वर पराभवाला सामोरे जावे लागले. अर्जुन इरिगासीने बोर्ड-3 वर डॉम्निगेझ पेरेझचा पराभव केला. बोर्ड-4 वर, विदित गुजरातीने लेव्हॉन अरोनियनसोबत ड्रॉ खेळला.

## संकेत गणेश बट्टू यांना स्पोर्टस अँड एक्सरसाइज सायन्समध्ये सुवर्णपदक




प्रतिनिधी
■ मुंबई

विद्याविहार पूर्व येथील सोमय्या विद्याविहार विद्यापीठाच्या वतीने 21 सप्टेंबर 2024 रोजी, महाविद्यालयाच्या सभागृहात 2021 - 2024 चा तिसरा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. सोमैया स्पोर्ट्स अकादमी संस्था च्या सोहळयात संकेत गणेश बट्टू यांना स्पोर्ट्स अँड एक्सरसाइज सायन्स मध्ये सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

संकेत गणेश बट्टू यांनी बॅचलर ऑफ सायन्स (स्पोर्ट्स अँड एक्सरसाइज सायन्स) पदवीमध्ये अव्वल क्रमांक प्राप्त केल्याबद्दल प्रतिष्ठित विद्यापीठ मार्फत सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. या समारंभामध्ये प्रमुख पाहुणे डॉ. श्रीमती. नल्लाथंबी कलैसेल्वी, DSIR चे सचिव आणि CSIR चे महासंचालक, भारत सरकार. तसेच कुलसचिव प्रा. नंदकुमार गिलके, कुलपती समीर सोमय्या, सोमय्या स्पोर्ट्स अकादमीचे संचालक एजाझ खान, सहाय्यक प्राध्यापक डॉ. नितीन पी. खानविलकर यांची उपस्थिती होती.

## असल्फा येथील रस्त्याला चुना लावून मनसेकडून पालिकेचा निषेध

प्रतिनिधी
■ मुंबई

असल्फा परिसरातील निकृष्ठ रस्त्याच्या कामाच्या विरोधात मनसे 160 चे शाखा अध्यक्ष राहुल नारायण चव्हाण यांच्या माध्यमातून चुना लावून प्रशासन निषेध करण्यात आला. असल्फा मेट्रो स्थानक जवळील जे के मेडिकल ते विद्यानगरी पाईप लाईन पर्यंतच्या मुख्य रस्त्यावर दोन वर्षापूर्वी सिमेंट कॉंक्रिटकरन करून रस्ता बनवण्यात आला होता. मात्र काही महिन्यातच या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. सिमेंटचे खडक वर येत असल्याने वाहनांना देखील अडथळा होत असल्याने सदर रस्ता पूर्ण खराब झाल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रस्त्याला चुना लावून प्रशासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला. विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग 160 चे शाखा अध्यक्ष राहुल नारायण चव्हाण यांच्या वतीने जे के मेडिकल ते विद्यानगरी पाईप लाईन पर्यंतच्या रस्त्यावर चुना फासून आंदोलन करत या निकृष्ठ कामाचा निषेध केला.



### राज्य ॲथलेटिक्स स्पर्धा

## ठाण्याच्या शौर्याची बालेवाडीत सुवर्ण कामगिरी

### नव्या विक्रमांची नोंद करत दोन सुवर्ण पदकांची कमाई

प्रतिनिधी
■ मुंबई

पुण्याच्या बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात ठाण्याच्या शौर्या रुपाली अंबुरे हिने सुवर्ण कामगिरी केली. मुलींच्या १६ वर्षाखालील ६० मी धावणी शर्यतीत शौर्याने ७.५८ सेकंदाचा नवीन विक्रम नोंदवून सुवर्णपदक पटकावले. तर ८०मी अडथळा शर्यतीत सुद्धा शौर्याने ११.४७ सेकंदाचा नवा राज्य विक्रम नोंदवून सुवर्ण धाव घेतली. या दोन्ही प्रकारात शौर्याने नवीन विक्रम आपल्या नावावर प्रस्थापित केले.




बालेवाडीत १९ ते २२ सप्टेंबर दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत दमदार कामगिरी करत ठाण्याच्या शौर्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. १६ वर्षाखालील मुलींच्या ६० मी धावणी स्पर्धेत शौर्याने यापुर्वीचा ७.७७ सेकंदाचा राज्य विक्रम मोडीत काढत ७.५८ सेकंदाचा नवीन विक्रम प्रस्थापित केला. तसेच ८०मी अडथळा शर्यतीत सुद्धा शौर्याने यापूर्वीचा ११.७६ सेकंदाचा राज्य विक्रम मोडीत काढून ११.४७ सेकंदाचा नवा राज्य विक्रम नोंदविण्याची किमया केली. या दोन्ही धावणी स्पर्धेत शौर्याने अन्य स्पर्धकांना मागे टाकत सुवर्ण पथके आपल्या नावावर केले. ठाण्याच्या युनिव्हर्सल हायस्कुलची विद्यार्थिनी असलेली शौर्या ज्येष्ठ क्रिडा प्रशिक्षक अजित कुलकर्णी यांच्या त्यांच्या एम स्पोर्ट्स अकादमीत गेल्या आठ वर्षांपासून खडतर प्रशिक्षण घेत आहे. शौर्याचे या कामगिरीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त होणाऱ्या सोयी सुविधासाठी आढावा बैठक घेण्याची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिना निमित्त दरवर्षी आढावा बैठक घेण्यात येते. तशी बैठक क्रम न बदलता घेण्यात यावी व आम्हाला तसे कळवावे अशी विनंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक वास्तु स्मारक संघर्ष समितीच्यावतीने कामगार नेते व चैत्य भूमी व्यवस्थापक रमेश जाधव व प्रतीक धनराज कांबळे (अध्यक्ष विश्वशांती सामाजिक संस्था) यांनी जी उत्तर विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांना केली आहे.

आपल्या वतीने होणाऱ्या बैठकांमध्ये विविध संघटना सामाजिक संस्था उपस्थितीत असतात. या बैठका सहा डिसेंबर च्या पुर्वी होत होत्या पण आता बैठकांचा क्रम बदलल्याने अनेक कार्यकर्ते व बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी यांच्यात मदभेद निर्माण होताना दिसतात . तसेच कागदावरती सांगितलेल्या व ठरलेल्या गोष्टी प्रत्यक्षात होताना दिसत नाही. अशी परिस्थिती निर्माण होते. कार्यकर्ते अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीचे नियोजन आपल्या कार्यालयात करून उपायुक्त परिमंडळ दोन चे प्रशांत सकपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्हावे. या बैठकीस संबंधित सर्व खाते प्रमुख व विविध संघटनांच्या उपस्थिती बैठकीचे

## बेस्ट उपक्रम विकणार आपल्या आगारांमधून सीएनजी गॅस

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एक अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. ती तोट्यात सुरू आहे. आता उपक्रमाने सीएनजी विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. बेस्ट उपक्रमाच्या सर्व २७ आगारांत सीएनजी स्टेशन उभारण्यात येणार आहेत.

आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी बेस्ट विविध उपक्रम राबवत आहे. मात्र अजूनही बेस्ट आर्थिक कोंडीत सापडली आहे. आर्थिक स्थितीतून सावरण्यासाठी बेस्ट उपक्रमाने आपल्या अखत्यारीतील आगारांत खासगी वाहनांची पार्किंगची सुविधा उपलब्ध केली आहे. मात्र दिवसेंदिवस आर्थिक संकट वाढत असल्याचे लक्षात घेऊन उपक्रमाने आता आगारांत सीएनजी विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी खासग वाहनधारकांसाठी घाटकोपर व गोरेगाव बस आगारांत प्रायोगिक तत्त्वावर सीएनजी विक्री स्टेशन उभारली आहेत. याठिकाणी खासगी वाहनधारकांचा प्रतिसाद लक्षात घेता आता उर्वरित २५ आगारांत सीएनजी स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सीएनजी स्टेशन उभारल्यानंतर खासगी वाहनधारकांना याठिकाणी सीएनजी गॅस भरता येईल आणि त्यांना घरापासून जवळच सीएनजी स्टेशन उपलब्ध होणार आहे. बेस्ट उपक्रमास सीएनजी विक्रीतून महसूल प्राप्त होईल व आर्थिक गाडा हाकण्यासाठी थोडीफार मदत मिळेल, असा विश्वास बेस्ट उपक्रमाने व्यक्त केला आहे.

गेल्या काही वर्षांत बेस्ट आर्थिक संकटात आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, कार्यरत कामगारांचा पगार, आस्थापना खर्च, वीज खरेदीचे पैसे यामुळे बेस्ट उपक्रमावर कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे. कर्जातून सावरण्यासाठी बेस्ट उपक्रमाने सन २०१६-१७ मध्ये मुंबई महापालिकेने अनुदानाची मागणी केली होती. पालिका दरवर्षी आपल्या अर्थसंकल्पात ७५० ते ८०० कोटीची बेस्ट उपक्रसाठी तरतूद करून ठेवते व सेवानिवृत्त कामगारांची देणी भागवण्यासाठी ही ४५० कोटी पेक्षा अधिक अतिरिक्त रक्कम देत असते.



**मुंबई :** मुंबई भाजप-उपाध्यक्ष आमदार राजहंस सिंह यांनी रविवारी दिंडोशी विधानसभा मतदारसंघात आपल्या आमदार निधीच्या माध्यमातून सुमारे १५ वेगवेगळ्या ठिकाणी समाज मंदिर, शौचालय, गटार, कॉंक्रिटीकरण, लोडिंग, ओपन शेड आदी सामाजिक कामांचे भूमिपूजन व उद्घाटन केले.

## शिवसेनेच्या सोशल मीडिया सैनिकांची फौज मैदानात, कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणार

### ३० सप्टेंबरपर्यंत १ लाख सोशल सैनिक प्रचारात उतरणार

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेनेच्या वतीने काही विशिष्ट विधानसभा मतदार संघात सोशल मीडिया मध्यवर्ती सेंटर उभारले जाणार असून तब्बल २५० सोशल मीडिया मॅनेजर नियुक्त केले जाणार आहेत. या माध्यमातून कार्यकर्त्यांना जनतेपर्यंत सकारात्मक पद्धतीने कसे पोहोचायचे याचे मार्गदर्शनही लाभणार आहे. समाजमाध्यमांवर प्रचलित असलेले वॅट्स अँप, इंस्टाग्राम आणि यूट्यूबच्या माध्यमाने सरकारने केलेली लोकाभिमुख कामे जनतेपर्यंत पोहचवली जाणार आहेत. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत सुमारे १ लाख सोशल सैनिक विधानसभेच्या प्रचारात उतरणार आहेत. अशी माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली.

शिवसैनिक हा प्रामाणिकपणे पक्षाचे काम करत आहे. त्याला समाजमाध्यमाची जोड मिळाली तर कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणे अवघड नसल्याचेही डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले.



वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात शिवसेनेच्या सोशल मीडिया विभागाची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत डॉ. शिंदे यांनी सोशल सैनिकांना मार्गदर्शन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन वर्षात केलेल्या अनेक लोकाभिमुख कामांची माहिती सोशल सैनिकांनी समाजमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवावी, तसेच विरोधकांचे खोटे नेरेटिव्ह खोडून काढा असे आदेश खासदार डॉ. शिंदे यांनी सैनिकांना दिले.

राज्यात विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहे. शिवसेनेकडूनही जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यांच्या समाजमाध्यम विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नियोजनेद्वारे राज्यातल्या कोट्यवधी मतदारांपर्यंत शिवसेना पोहोचणार असल्याची माहिती शिवसेनेचे संसदेतील गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काल दिली.

शिवसेनेच्या सोशल सैनिकांची फौज मैदानात उतरली असून आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने आयोजित केलेल्या या शिवसेना सोशल मीडियाचा आवाज जनतेपर्यंत पोहोचण्याची रूपरेषा सांगत डॉ शिंदे यांनी सैनिकांचा उत्साह द्विगुणित केला. आतापर्यंत कोणत्याही सरकारने कमी काळात इतकी लोकाभिमुख कामे केली नाहीत, जेवढी कामे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुती सरकारने केली असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसिध्दी माध्यमात इलेक्ट्रॉनिक माध्यमासह सध्या डिजिटल समाजमाध्यम अतिशय प्रभावशाली आणि संवेदनशील असून याचा वापर कार्यकर्त्यांनी पक्ष संघटन वाढीसाठी ही करावा अशी सूचनाही ही त्यांनी यावेळी केली.



## सुविचार

स्वप्नांना सत्यात
उतरवण्यासाठी
मेहनत करावी लागते

# उदबत्तीची खूप आकर्षक, वेगवेगळी घरे !

लेखक
मकरंद करंदीकर

हिंदू धर्मामध्ये होणाऱ्या पंचोपचारी देवपूजेमध्ये गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य असे पाच उपचार सांगितलेले आहेत. पण आपल्या त्यासंबंधित मंत्रांमध्ये उदबत्ती हा शब्द कुठेही म्हटला जात नाही.

अगदी वेदकालापासून धूप, ऊद, चंदन, कापूर असे अनेक पदार्थ आपल्याला माहिती होते. तरी सुरुवातीला बांबूच्या वापराशिवाय केलेल्या या पदार्थांच्या वड्या, शंकू, लांब वर्तिका म्हणजे वाती किंवा कापसाच्या वाती बरोबर गुंडाळलेले चूर्ण, थेट निखाऱ्यांवर हे चूर्ण जाळणे, त्याची धुरी तयार करणे इत्यादी विविध मार्गांनी हे " धूपम् समर्पयामी " केले जात असे. त्याच्या सुटसुटीत वापरासाठी, उदबत्त्या बनविण्याचा प्रयोग हा नंतरच्या काळात केला गेला असावा. पूर्वी आपल्याकडे विविध प्रकारच्या कापसाच्या वातींना आधार देण्यासाठी तुळशीच्या, बेलाच्या काड्या वापरल्या जात असत. उदबत्त्या बनविण्यासाठी बांबूचा उपयोग नक्की कधीपासून करण्यात आला याचा नेमका उल्लेख सापडत नाही.







आपल्याकडे बांबू जाळणे हे निषिद्ध मानले गेले आहे. बांबूमध्ये असलेल्या शिशाचे, बांबू जाळल्यानंतर त्यातून लेड ऑक्साईड तयार होऊन धुराद्वारे आपल्या शरीरात प्रवेश करते.ते शरीराला अत्यंत हानिकारक असते.( यामुळेच तिरडी बांधण्यासाठी वापरलेले बांबू, स्मशानात गेल्यानंतर वेगळे फेकून दिले जातात पण ते जाळले जात नाहीत.) याशिवाय बांबूला वंशवृद्धीचे प्रतीक मानले गेले आहे. तरीही दरवर्षी निर्माण होणाऱ्या अब्जावधी उदबत्त्यांमध्ये बांबूच्या काड्या वापरल्या जातात हे सत्य आहे. सुमारे २५०० वर्षांपूर्वी भारतातील बौद्ध भिक्षुंनी ही अगरबत्ती चीन या देशात नेली असावी असे मानले जाते.

ऊद वापरून तयार केलेली ती उदबत्ती. अगरूपासून तयार केली गेलेली ती अगरबत्ती आणि धूपापासून बनवतात ती धूपबत्ती होय. हा मूळचा भारतीयच प्रकार असल्यामुळे भारतातील सर्व धार्मिक ठिकाणी याचा वापर केला जातो. अशा उदबत्त्या, धूप - कापूर - ऊद जाळण्यासाठी अत्यंत विविध प्रकारची कोरीव, कलात्मक घरे किंवा स्टॅन्ड तयार केले गेले आहेत. त्यामध्ये शेकडो वर्षांचे, त्या त्या प्रांतातील कला आणि संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

माझ्या संग्रहात सुमारे ५० विविध प्रकारची, गेल्या शतकापासून वापरली गेलेली उदबत्तीची विविध घरे म्हणजेच " अगरबत्ती स्टँड्स " आहेत. यातील सुमारे २५ घरे मी यावर्षीच्या आमच्या घरच्या गणपतीच्या समोर आरास म्हणून मांडली होती. यात हत्तीच्या सोंडेतील, हत्तीच्या पाठीवरील, चार हत्तींच्या पाठीवरील, एका हत्तीच्या पाठीवर माहूत व २ वानरांसह ३४ उदबत्यांचे घर अशी काही घरे ही हत्ती संबंधातील होती. उदयपूरच्या विजयस्तंभाचे, नागाच्या फणीवरील फुलामध्ये असलेले, दक्षिणेतल्या गरुडस्तंभासारखे असलेले, बुद्धिबळातील हत्ती आणि उंट यांच्यासारखी दिसणारी, लाकडी, काचेची, चांदीची, दगडी, शंखापासून बनवलेली, बारीक तारेची अशी अनेक विविध प्रकारची उदबत्ती घरे मांडली होती. याशिवाय ५ किंवा ११ दिव्यांची, कापराची जशी आपण आरती ओवाळतो तशी उदबत्त्यांची दुर्मीळ आरती सुद्धा मांडली होती. याशिवाय कांही उदबत्ती घरांसोबतच तेल घालून उजळण्याचे दिवेही आहेत. सोबतचे १६ फोटो अवश्य पाहावेत.

### उदबत्त्यांचा मजेदार वापर

चीनमध्ये ६ व्या शतकामध्ये वेळ मोजण्यासाठी विविध प्रकारच्या उदबत्त्या वापरात होत्या. धूप हा ज्योत धारण न करता संथपणे जळतो. किती तास जळण्यासाठी किती धूप लागतो, तो किती लांबीच्या खाचेत भरावा लागतो किंवा किती जाडी व लांबीची उदबत्ती बनवावी लागते याचा सतत अभ्यास केला गेला. मजेदार गोष्ट म्हणजे एक तास संपून दुसरा तास सुरु झाला हे सहज कळण्यासाठी वेगवेगळे सुगंध वापरले जात असत. येणारा सुगंध बदलला म्हणजे पुढचा तास सुरु झाला हे लांबूनही लक्षात येत असे. आपल्याकडे विविध कीटक - मच्छर मारण्यासाठी, हवा शुद्ध करण्यासाठी, विविध रोगांवर उपचारांसाठी, जादूटोण्यासाठी विविध उदबत्त्या वापरल्या जातात. अयोध्येच्या राम मंदिराच्या उदघाटनावेळी १०८ फुटांची विक्रमी उदबत्ती बनविली गेली होती. अत्यंत गंमतीदार, स्वस्त, सहज उपलब्ध उदबत्ती घरे म्हणजे गावांमध्ये गावजेवणाच्या वेळी पंक्तींमध्ये कच्च्या बटाट्याच्या फोडींमध्ये उदबत्त्या टोचून ठेवल्या जात असत. तर देवळांमध्ये केळयात उदबत्ती खोचून ठेवली जाते.

# गणपती बाप्पा इज ऑलवेज ग्रेट !

लेखक
प्रशांत कुळकर्णी

**माझगाव** येथील तार वाडीतील बिआयटी चाळीमध्ये राहात असलेल्या सायलीच्या घरी गणपती बाप्पा येणार होते.गणपती बाप्पा येणार म्हणून सायलीच्या आईची धावपळ सुरू होती. चिवडा लाडू, नारळाच्या वड्या, शंकरपाळया,असे गोडधोड फराळाचे पदार्थ तयार झाले होते.शंकरपाळया बरणीत भरून झाल्यानंतर तिला नारळ कीसायचे होते.बाप्पांना बसवायचे टेबल मांडून झाले होते. त्याच्यावर सुबक सुंदर कागदी मखर सजवायचे होते,सायलीचे बाबा आज ऑफिसमधून लवकर येणार होते.

ते घरी येताना भायखळयाच्या बाजारातून दुर्वा फुले,फळे,पत्री,विकत आणणार होते.

उद्या बाप्पांना आवडणारे मोदक बनवायचे होते म्हणून सायलीच्या आईने नारळ खवणायला घेतले.

दहा बारा मिनिटांतच कीसणीच्या खाली ठेवलेल्या थाळीत पांढऱ्या शुभ्र खोबऱ्याची रास जमा झाली.सायलीची आई तल्लीन होऊन नारळ कीसत होती, इतक्यात तिची नजर ताटामध्ये किसलेले खोबरे अलगद उचलून घेणाऱ्या गोऱ्यापान इटुकल्या सडपातळ बोटांकडे गेले.

“ सायु लबाडे बाप्पांच्या मोदकासाठी कीसलेल्या खोबऱ्यात अजिबात हात टाकायचा नाही ! नाही म्हणते ना ! उद्या नैवद्य दाखवल्या नंतर मोदक खा हवे तेवढे. आज कशी ग गुपचूप मांजरीच्या पावलांनी आलीस ? रोजच्या सारखा दंगा नाही मस्ती नाही. जा पाहू हातपाय धुवून घ्या मग दुधपोहे देते”. सायलीची आई म्हणाली.

“अग आई लहान मुले म्हणजे देवाघरची फुले असतात गणपती बाप्पांचे खोबरे बचकभर आम्ही नाही खाणार तर कोण खाणार ?”

आपल्या तोडांत मऊ लुसलुशीत,खोबऱ्याचा बकाणा भरत सायली म्हणाली आणि दफ्तर सोफ्यावर टाकून हातपाय धुवायला पळाली.

थोड्याच वेळात सायली हात पाय धुवून कपडे बदलून आली. तिच्या हातात दुधपोह्याची वाटी देताना आई म्हणाली, “ सायली रात्री मी आणि बाबा सजावट करणार आहोत, तू लवकर झोप आपल्याला लवकर सकाळी अंजिर वाडीत जाऊन बाप्पांना आणायचे आहे! आणि बरं का तुझ्या मित्र मैत्रिणींना सुध्दा सांग सकाळी सात वाजता तयार राहायला.

तुझा जीवन मामा मोठ्ठी गाडी घेऊन येणार आहे आपल्या गणपती बाप्पांना घरी आणण्यासाठी ”!

“अरे व्वा जीवन मामा आणि त्याची मोठ्ठी गाडी आई किती किती मजा मजा येईल! मी बाप्पांच्या पाटाला माझ्या मांडीवर घेणार आणि गाडीत समोर बसणार मामाच्या बाजूला ! सायलीने घाईघाईने दुधपोहे पोटात ढकलले आणि म्हणाली

“ मी आत्ताच जाते आणि शकू,मंदा ,रोहन मोहन सगळ्यांना सांगून येते”. असे सांगून सायलीने बाहेर धुम ठोकली.



दुसरा दिवस होता ७ सप्टेंबरचा.सायली तयार झाली, मित्र मैत्रिणींना जमा केले.जीवन मामाची इनोव्हा गाडी आलीच होती. मुलांची टोळी गाडीत एकच गलका करत होती. इयत्ता पाचवी सहावीत शिकणाऱ्या ह्या मुलांना गणपती बाप्पांचे खुप कौतुक वाटत होते.

आई बाबा आणि जीवन मामांच्या सोबत सगळी मुले अंजिर वाडीतील मुर्तीकारांच्या दुकानात जाण्यासाठी निघाले.

जातांना रस्त्यावर खुप गाड्या होत्या,जिकडे तिकडे बाप्पांच्या येण्याची लगबग सुरू होती. गाड्या खुप त्यामुळे मामाची गाडी हळूहळू पुढे जात होती. एका ठिकाणी माझगाव कोर्टावर खुप गाड्या पुढे असल्यामुळे गाडी पुढेच सरकत नव्हती, गाडीत पुढे बसलेली सायली शांत झोपी गेली.

झोपी गेलेल्या सायलीला स्वप्न पडले,ती बाजारात रस्ता चुकली,तीला काहीच कळेना कुठे जायचे ? कसे जायचे ? ती घाबरली , आजुबाजुला सगळं नवीन नवीन दिसत होते, रस्ते,दुकाने,दुकान वाले,काही काही तिच्या ओळखीचे नव्हते.लहानशी घाबरलेली बावरलेली सायली इथे तिथे भिरभिरत पाहायला लागली. इतक्यात समोरुन एक माणूस आला,त्याने सायलीकडे हसून पाहिले, तिच्या हातात एक चॉकलेट दिले.आणि म्हणाला, “ सायली चल माझ्या मागे मागे,तुला आईस्क्रीम खायला देतो !” आईस्क्रीमचे नाव घेताच सायली हळूहळू हसायला लागली, आईस्क्रीमसाठी त्या माणसाच्या मागे धावायला लागली,धावता धावता वाटेत अंधार झाला , त्या लबाड वाईट माणसाचा चेहरा आता बदलून गेला होता,तो खूप रागात होता,तो रागारागाने दात ओठ चावत सायलीच्या दिशेने धावत येत होता,त्या माणसाचा भयंकर चेहरा पाहून सायली घाबरुन ओरडली.

“आई बाबा आई बाबा ! गणपती बाप्पा गणपती बाप्पा ”!

आणि काय आश्चर्य गणपती बाप्पा समोर आले सायलीचा हात हळूवारपणे पकडला, आपल्या सोंडेचा जोरदार फटका त्या रागीट, भयंकर माणसाला मारला,तसा तो माणूस लांब लांब फेकला गेला.

बाप्पांनी सायलीच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला आणि म्हणाले.

“सायली बाळ तुला काय आवडते ग खुप खुप ?” “बाप्पा मला चॉकलेट आणि आईस्क्रीम खुप खुप आवडतात !”

आणि तो माणूस,ज्याला मी सोंडेचा फटका दिला तो पण आवडतो का ? ओळखतेस का त्याला ?

“नाही बाप्पा तो तर अजिबात आवडत नाही आणि ओळखत सुध्दा नाही !” सायली म्हणाली.

“ मग तु त्याच्या कडून चॉकलेट का घेतलेस ? आईस्क्रीमसाठी का त्याच्या मागे मागे गेलीस?”

“ बाप्पा मी चुकले आईस्क्रीम आणि चॉकलेटमुळे फसले! अंधारात अडकले.बाप्पा तुम्ही धाऊन आलात म्हणून वाचले ! थॅंक यु बाप्पा ! सायली बाप्पांना हात जोडून म्हणाली.

“ सायली फार फार वर्षापूर्वी खुप राक्षस होते त्यांना तर मी केव्हाच मारुन संपवले.पण आता माणसाच्या रुपातील राक्षस लपून छपून वावरतात. लहान मुलांची शिकार करतात.

आपण ज्याला कधीच पाहिले नाही,जो आपल्याला ओळखत नाही,त्यांच्याशी बोलायचे नाही, चॉकलेट, आईस्क्रीम अजिबात घ्यायचे नाही. आईचे हात बाबांचे हात म्हणजे ओळखीचे हात बाकीचे हात अनोळखी हात! अनोळखी लोकांकडून काही घ्यायचे नाही, बोलायचे सुध्दा नाही . आईबाबांना विसरायचं नाही.

सायलीने हात जोडले आणि जोरात ओरडली. गणपती बाप्पा मोरया सगळ्यांसाठी धावून या !

इतक्यात मामाच्या आवाजाने सायलीची झोप उडाली,ती खडबडून जागी झाली.मामाच्या हातातील पाटावर मोरासनावर बसलेली कुरळे काळे भोर,लांब लांब केसाचे जावळ असलेले बाल गणेशाची मूर्ती सायलीकडे पाहून हसत होती.

“सायली अग उठ हे बघ आपले बाप्पा त्यांचा पाट घेणार ना तू तुझ्या मांडीवर ? जीवन मामाने विचारले.“अरे जीवन मामा हेच तर बालगणपती माझ्या स्वप्नात आले आणि मला भयंकर, वाईट माणसाच्या तावडीतून सोडवले !”सायली म्हणाली. सायलीचे बोलणे ऐकून तिच्या मित्र मैत्रिणींना कोण आनंद झाला. सायलीने सर्वांना गणपती बाप्पांनी जे जे समजावून सांगितले ते सर्व सांगितले.मग सायलीने सर्वांना विचारले. “अनोळखी माणसांकडून चॉकलेट आणि आईस्क्रीम घेणार का ?”

“ अजिबात नाही ! नो ओळख नो आईस्क्रीम नो चॉकलेट! गणपती बाप्पा इज ऑलवेज ग्रेट”!

# बियाणांचं मडकं

एके काळी भरत आणि कुमार नावाचे दोन मित्र होते. भरताने तीर्थयात्रेला जाण्याचे ठरवले. भरताकडे 5000 सोन्याची नाणी होती. त्याने सर्व सोन्याची नाणी एका घागरीत ठेवली आणि त्यात वरून बिया टाकल्या. जेणेकरून संपूर्ण मडक्यात फक्त बिया आहे असे दिसत होते. हे भांडे घेऊन तो कुमारच्या घरी गेला. मी माझ्या कुटुंबासह तीर्थयात्रेला जात असल्याचे त्याने कुमारला सांगितले. मला एक वर्ष लागेल, मी परत येईपर्यंत हे भांडे तुमच्याकडे ठेवा असं म्हणाला.",

कुमारने मडकं सोबत ठेवल्या. एक वर्ष उलटले पण भरत तीर्थयात्रेहून परतला नाही. भांड्यात काय आहे हे जाणून घेण्यासाठी कुमारने संपूर्ण भांडे रिकामे केले. जेव्हा त्याला मडक्यात तळाशी सोन्याची नाणी सापडली तेव्हा त्याला खूप आनंद झाला. त्याने सर्व सोन्याची नाणी घेतली. यानंतर त्यांनी बाजारातून नवीन बिया आणून मडकं भरून दिलं. काही दिवसांनी भरत तीर्थयात्रेहून परतल्यावर त्याने कुमारला त्याचे भांडे मागितले. कुमारने त्याला ते मडकं दिले.



भरताने घागरीत सोन्याची नाणी न पाहता कुमारकडे सोन्याची नाणी मागायला सुरुवात केली. कुमारांनी त्याला नकळत विचारले की तू मला बियांनी भरलेला एक घागरी दिली होती त्यात सोन्याची नाणी दिली नव्हती. भरत कुमारला घेऊन तेनाली रमणकडे आला. त्याने झालेला सर्व प्रकार सांगितला नाली रमणने मडक्यातील बिया पाहिल्या आणि सांगितले की, दीड वर्षांपूर्वी तू कुमारकडे मडकं सोडलं होत पण या बिया नवीन दिसत आहेत. कुमारने तुझ्या घागरीतून सोन्याची नाणी काढली आणि बाजारातून आणून त्यात नवीन बिया टाकल्या. कुमार अजूनही तेनाली रमणला नकार देऊ लागला की त्याने सोन्याची नाणी काढली नाहीत. तेनालीने कुमारला सांगितले की आता तुम्हाला १०००० सोन्याची नाणी भरताला परत करावी लागतील. हे ऐकून कुमार आश्चर्याने म्हणाले की अरे पण का? मडक्तयात तर 5000 नाणीच होत्या. असे बोलल्यामुळे त्याने सोन्याची नाणी चोरल्याचे उघडकीस आले. भरतने तेनाली रमणच्या हुशारीचे कौतुक केले.


## मनोरंजक शब्दकोड




## चित्रातील 5 फरक ओळखा




## चित्र रंगवा



## बालचित्ररंग




विहान माजलकर
ukg, डॅफोडिल्स स्कूल, भांडुप(प).




## स्टाईल मारो



सृष्टी धुरी

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



संबोधी नितीन घनवट
पहिला वाढदिवस